



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक १३४ * नांदेड * गुरूवार, दि. २१ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# नांदेडसह राज्यात उष्णतेचा कहर!

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात पुन्हा एकदा उष्णतेची तीव्र लाट उसळली असून राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाने अक्षरशः विक्रमी पातळी गाठली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात तर उन्हाने कहर केला असून काही ठिकाणी तापमान चक्क ४६ अंश सेल्सिअसच्याही पुढे गेले आहे. याचबरोबर नांदेड शहरात बुधवारी ४४ अंशांची नोंद पहावयास मिळाली. वाढत्या उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले असून भारतीय हवामान विभागाने (एमआयडी) नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचा इशारा दिला आहे.



नागपूरसह संपूर्ण विदर्भात तापमान आणखी वाढण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. पुढील आठवडाभर विदर्भात उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज आहे. याच पार्श्वभूमीवर अकोला, अमरावती, वर्धा आणि नागपूर या जिल्ह्यांसाठी हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

नागपूरमध्ये तापमानाचा पारा तब्बल ४५.५ अंश सेल्सिअसवर पोहोचला आहे. वाढत्या तापमानामुळे उकाडाही प्रचंड वाढला असून नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. उष्माघाताचा धोका वाढल्याने हवामान विभागाने विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. मंगळवारी विदर्भातील तीन जिल्ह्यांमध्ये तापमान ४६ अंशांवर पोहोचले, तर आणखी तीन जिल्ह्यांमध्ये तापमान ४५ अंशांच्या पुढे गेले होते.

दरम्यान, वर्धा जिल्ह्यातही उष्णतेने उच्चांक गाठला आहे. सलग दोन दिवस वर्ध्यात ४६.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सकाळपासूनच कडक उन्हाच्या झळा जाणवत असून दुपारी परिस्थिती अधिक गंभीर होत आहे. वाढत्या उष्णतेमुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि बाहेर काम करणाऱ्यांना विशेष खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

दिलासादायक बाब म्हणजे यंदा जूनच्या दुसऱ्या आठवड्यात मान्सून विदर्भात दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मात्र तोपर्यंत नागरिकांना उष्णतेच्या तीव्र लाटेचा सामना करावा लागणार आहे.

दरम्यान, मुंबईतही उष्ण आणि दमट हवामानामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. हवामान खात्याच्या अंदाजानुसार मुंबईतील कमाल तापमान ३५ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता असून आर्द्रतेचे प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. त्यामुळे हॉट अँड ह्युमिड वातावरणामुळे उकाडा अधिक जाणवणार आहे.

मुंबई, उपनगर आणि ठाणे परिसरात सकाळपासूनच प्रचंड घाम आणि अस्वस्थता जाणवत आहे. समुद्रकिनारी भागात दमट वारे वाहत असल्याने उष्णतेचा त्रास आणखी वाढला आहे. काही भागांत ढगाळ वातावरण आणि हलक्या पावसाच्या सरींचा अंदाज असला, तरी उकाड्यात फारसा दिलासा मिळण्याची शक्यता नाही.

हवामान विभागाने नागरिकांना दुपारच्या वेळेत शक्यतो घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे. भरपूर पाणी पिणे, हलके व सैल कपडे वापरणे आणि उन्हात जास्त वेळ न राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पुढील काही दिवस राज्यभर उष्णतेचा तडाखा कायम राहण्याची शक्यता असल्याने प्रशासनही सतर्क झाले आहे.

# शिवराज मोटेगावकरच्या पुण्यातील आरसीसी कॅम्पसवर बुलडोझर, दोन मालमत्ता सील

**पुणे (प्रतिनिधी)–** नीट पेपरफुटी प्रकरणात अडकलेल्या शिवराज मोटेकरगावकर याच्या पुण्यातील आरसीसी कॅम्पसवर बुलडोझर चालविण्यात आले आहे. नीट प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने शिवराज मोटेगावकर याला ताब्यात घेतल्यानंतर, पुणे महानगरपालिकेने मोटेगावकर यांच्याशी संबंधित दोन मालमत्ता सील केल्या आहेत. त्यांच्या आरसीसी क्लासेसच्या पुणे परिसरातील कॅम्पसवर थेट बुलडोझर चालविण्यात आले आहे.




महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, थकीत मालमत्ता कर आणि व्यावसायिक जागेचा कथित अनाधिकृत वापर केल्याप्रकरणी ही धडक कारवाई सुरू करण्यात आली आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पुण्यात मोटेगावकर यांच्याद्वारे चालवल्या जाणाऱ्या 'आरसीसी क्लासेस'च्या या आवारातून जेईई आणि नीट च्या विद्यार्थ्यांसाठी कोचिंग क्लासेस चालवले जात होते. या मालमत्तांवर तब्बल ३.२० कोटी रुपयांचा मालमत्ता कर थकीत होता, ज्याची वसुली न झाल्यामुळे अखेर पालिकेने ही मोठी कारवाई करण्याचे आदेश जारी केले.

या अधिकृत आदेशांनुसार कारवाई करत पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने जे. एम. रोडवरील एका इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील दुकान क्रमांक १ ला रितसर सील ठोकले आहे. आवश्यक परवानग्या न घेता या ठिकाणी कोचिंग क्लासेस चालवले जात असल्याचे नोटीसमध्ये नमूद करून पालिकेने संबंधित जागा सील केली आहे. शिवराज मोटेगावकर यांचा हा प्रसिद्ध 'आरसीसी क्लासेस'चा कॅम्पस जे. एम. रोडवरील बोरावके बिल्डिंगमध्ये स्थित आहे, जिथे हजारो विद्यार्थी वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांचे शिक्षण घेत होते. मात्र, सीबीआयच्या कारवाईनंतर आता स्थानिक प्रशासनानेही मोटेगावकर यांच्या अवैध व्यावसायिक उपक्रमांवर कडक कायदेशीर बडगा उगारण्यात आला आहे.

पुणे महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या कारवाईबाबत अधिक माहिती देताना सांगितले की, संबंधित बोरावके इमारतीमध्ये केवळ कराचीच थकबाकी नव्हती, तर इमारतीच्या मूळ आराखड्यात अनेक गंभीर बदल करण्यात आले होते. तपासणी दरम्यान या इमारतीमध्ये बेकायदेशीर पार्किंग आणि मोठ्या प्रमाणावर अनाधिकृत बांधकाम करण्यात आल्याचे पालिकेच्या पथकाला आढळून आले. याच कारणांमुळे महापालिकेने तातडीने घटनास्थळी पोलीस बंदोबस्तात बुलडोझर आणून अनधिकृत बांधकामावर कारवाई सुरू केली.

दरम्यान, पुणे महानगरपालिकेने केवळ जे. एम. रोडवरील या कॅम्पसपुरतीच आपली कारवाई मर्यादित ठेवलेली नाही. मनपा प्रशासनाने शिवराज मोटेगावकर यांच्याशी संबंधित पुणे शहरातील इतर सर्व मालमत्तांची आणि जागांची सखोल चौकशी सुरू केली आहे. मोटेगावकर यांच्या इतर मालमत्तांवरही कर थकीत आहे का? किंवा तिथेही काही अनधिकृत बांधकाम करण्यात आले आहे का? याचा शोध महापालिकेचे संबंधित विभाग घेत आहेत.

# मान्सून वारे कमकुवत होण्याची भीती

**मुंबई (प्रतिनिधी)–** देशात उष्णतेची विक्रमी तीव्र लाट पसरली आहे. दरम्यान, स्कायमेट या हवामान संस्थेने अरबी समुद्रावर एक नवीन प्रणाली तयार झाल्याचा अहवाल दिला आहे, ज्यामुळे मान्सूनचे वारे कमकुवत होऊ शकतात. यामुळे केरळसह दक्षिण भारतात पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे.

संस्थेने दिलेल्या माहितीनुसार पुढील आठवडाभर मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान, हरियाणा, पंजाब, छत्तीसगड, ओडिशा, महाराष्ट्र आणि गुजरातसह १० राज्यांमध्ये कोरडे, उष्ण वारे वाहतील. संस्थेनुसार, या काळात या राज्यांमध्ये कमाल तापमान ४५ अंश किंवा त्याहून अधिक पोहोचेल. पश्चिमी प्रणाली कमकुवत झाल्यामुळे आणि कोणतीही सक्रिय हवामान प्रणाली नसल्यामुळे पावसाची शक्यता नाही.

मंगळवारी, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान, हरियाणा, दिल्ली, पंजाब आणि महाराष्ट्रातील २२ शहरांमध्ये तापमान ४५ अंश पेक्षा जास्त होते. उत्तर प्रदेशातील २२ जिल्ह्यांमध्ये ४० अंश किंवा त्याहून अधिक तापमानाची नोंद झाली. उत्तर प्रदेशातील बांदा हे ठिकाण मंगळवारी सलग तिसऱ्या दिवशी देशातील सर्वात उष्ण ठिकाण ठरले, जिथे तापमान ४८.२ अंश होते. गेल्या दोन दिवसांपासून येथील तापमान ४६ अंशांच्या वर राहिले आहे. बांदा येथे १५ मे २०२२ रोजी ४९ अंश तापमानाचा विक्रम नोंदवला गेला होता.

# राज्यात पेट्रोल-डिझेल तुटवड्याच्या अफवा

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात पेट्रोल-डिझेल तुटवड्याच्या अफवा पसरत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. पॅनिक होऊन पेट्रोल-डिझेल खरेदी करू नका. राज्यात आणि देशात पुरेसा साठा उपलब्ध आहे. अफवांमुळेच पुरवठा साखळी विस्कळीत होण्याचा धोका निर्माण होतो, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुंबईत माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, केंद्र सरकारने वारंवार स्पष्ट केले आहे की देशाकडे पेट्रोल-डिझेलचा स्ट्रॅटेजिक साठा उपलब्ध आहे आणि पुरवठाही नियमित सुरू आहे. मात्र सोशल मीडियावर आणि विविध ठिकाणी तुटवड्याच्या अफवा पसरत असल्याने नागरिक घाबरून मोठ्या प्रमाणात इंधन खरेदी करत आहेत.

पुढे ते म्हणाले, जर एका दिवशी सर्व लोकांनी बँकेत जाऊन पैसे काढायला सुरुवात केली, तर बँकेवर अचानक ताण येतो. याचा अर्थ बँकेकडे पैसे नाहीत असा होत नाही, असे उदाहरण देत तशीच परिस्थिती पेट्रोल-डिझेल पुरवठ्याची आहे.

# विधान परिषदेचा जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला, भाजपला सर्वाधिक जागा

## काही ठिकाणी आदलाबदलीची शक्यता



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील १७ जागांसाठी होणाऱ्या विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी महायुतीचा जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यानुसार भाजपच्या वाट्याला सर्वाधिक म्हणजे १२ जागा, शिवसेनेला ३ जागा तर राष्ट्रवादीच्या वाट्याला दोन जागा मिळणार असल्याची प्राथमिक माहिती आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत या जागा वाटपावर अंतिम शिक्कामोर्तब होणार असल्याची माहिती आहे. यासह काही ठिकाणी आदलाबदलीची शक्यताही असल्याचे समोर येत आहे.

विधान परिषदेच्या १७ जागांसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. तर २२ जून रोजी त्याचा निकाल लागणार आहे. या निवडणुकीमध्ये महायुतीचे पारडे जड असल्याचं चित्र आहे. त्याच पार्श्वभूमीवर विधानपरिषद निवडणुकीसाठी महायुतीचा प्राथमिक फॉर्म्युला समोर आला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांतील संख्याबळावर महायुतीच्या नेत्यांमध्ये प्राथमिक चर्चेस सुरुवात झाली आहे. सदस्य संख्या जास्त असलेल्या पक्षाकडून संबंधित विधानपरिषद जागेवर दावा सांगण्यात येत आहे. या सूत्रानुसार भाजपच्या वाट्याला १२, तर शिवसेनेच्या वाट्याला ३ व राष्ट्रवादीच्या वाट्याला २ जागा येणार असल्याची माहिती आहे.

# 'नीट' पेपरफुटी प्रकरणी नांदेडमध्ये आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)–** 'नीट' परीक्षेतील कथीत पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा व इतर मागण्यांसाठी विद्यार्थी कृती समितीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बुधवार, दि.२० मे रोजी धरणे आंदोलन करण्यात आले आहे.




नांदेड जिल्हा विद्यार्थी कृती समितीने निवेदनात म्हटले आहे की, 'नीट' परीक्षा ही देशातील वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी अत्यंत महत्वाची परीक्षा असून तिच्या पारदर्शकतेवर देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अवलंबून आहे. मात्र पेपरफुटीच्या सतत समोर येणाऱ्या घटनांमुळे मेहनती विद्यार्थ्यांच्या संधी हिरावल्या जात आहेत. पेपरफुटीमुळे शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासास तडा गेला आहे. 'नीट' पेपरफुटी प्रकरणातील चौकशीत रोज नवनवीन माहिती समोर येत आहे. या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार, दलालांचे जाळे आणि संस्थात्मक निष्काळजीपणा समोर येत आहे. 'नीट' पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंग यांच्यावर प्रशासकीय जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. पेपरफुटी प्रकरणामुळे निर्माण झालेल्या मानसीक तणावातून आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रकरणांची गंभीर दखल घेवून संबंधीत जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# वाढत्या तापमानाचा परिणामः नांदेड शहरात चार ठिकाणी आगीच्या घटना

## आर्थिक मोठे नुकसान, मात्र सुदैवाने जीवितहानी टळली

**नांदेड (प्रतिनिधी)–** वाढत्या तापमानामुळे शहराच्या विविध भागात दि. २० मे रोजी चार आगीच्या घटना घडल्या. मात्र या आगीवर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणली. या आगीत व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने दिलेल्या माहितीनुसार रात्री बारा वाजता चौफाळा येथे घराला आग लागली होती. यावेळी ती आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन अधिकारी केरोजी दासरे यांनी आपल्या प्रथम पथकातील कर्मचारी आग विझवण्याकरिता रवाना केले.

घटनास्थळी पोहचताच निदर्शनास आले की, आग ही घरातील संसार उपयोगी साहित्यांना लागली होती, त्या वरती अग्निशमन वाहनाच्या होजरील होजच्या सहाय्याने पाणी मारून विझवण्यात आले. आगीमध्ये घरातील टेबल, अंथरून पांघरून, लाकडे, व संसार उपयोगी वस्तू जळाल्या असल्याचे घरमालक भालचंद्र पत्की यांनी सांगितले व आग घराबाजूस लावलेल्या फटाक्यांच्या आतिषबाजी मुळे लागली, असल्याचे त्यांनी सांगितले.


रात्री १ वाजता हबीब टॉकीजजवळील फर्निचर दुकानाला आग लागल्याची घटना समोर आली. अशी माहिती प्राप्त झाल्यानंतर लागलीच एक अग्निशमन वाहन घटनास्थळी कर्मचाऱ्यांसहीत रवाना झाले. घटनेच्या ठिकाणी पोहोचताच निदर्शनास आले की, आग मोठ्या स्वरूपाची आहे, म्हणून खबरदारीचा उपाय घेत अतिरिक्त कुमक मागविण्यात आली. दोन्ही अग्निशमन वाहनाच्या डेलिव्हरी होजच्या सहाय्याने आगीवर पाण्याचा सतत मारा करण्यात आला व ती आग पूर्णपणे विझवण्यात आली.



आगीमध्ये फर्निचर दुकानातील रंदा मशीन, ड्रिल मशीन, जिगज्याक मशीन, तसेच सागवान लाकडे, प्लायवूड इत्यादी साहित्य जळाल्याचे दुकान मालक इस्माईल चाऊस यांनी सांगितले.

तिसरी घटना रात्री २.१५ वाजता यशोविहार कॉलनी येथे मोकळ्या जागेत झाडांझुडपाना आग लाली होती. ती आग विझवण्यात आली. तर चौथी घटना भाग्यनगर येथे महावितरण डीपी नंबर २८२ ला लागलेली आग विझवण्यात आली.

आगीवर अग्निशमन अधिकारी के. एस. दासरे, उप अग्निशमन अधिकारी निलेश कांबळे, साजिद, पंडित, ताटे, पवळे, कदम, पठाण, धुळगंडे, वाहन चालक नरवाडे यांनी नियंत्रण मिळविले.




# नांदेड येथे उपसंचालक, भूमी अभिलेख कार्यालयास मंजुरी

## नांदेड, हिंगोली, लातूर व धाराशिव जिल्ह्यांना मिळणार स्वतंत्र प्रशासकीय सुविधा

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड येथे उपसंचालक, भूमी अभिलेख कार्यालय स्थापन करण्यास महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिली आहे. विशेष म्हणजे, पूर्वी छत्रपती संभाजीनगर येथून कार्यरत असलेल्या विभागीय कार्यक्षेत्राचे प्रशासकीय विभाजन करून नांदेड, हिंगोली ,लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांसाठी स्वतंत्र उपसंचालक कार्यालय नांदेड येथे मंजूर करण्यात आले आहे. यासाठी राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी मुख्यमंत्री, महसूलमंत्री तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.



महसूल व वन विभागाच्या दि. २० मे २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार भूमि अभिलेख विभागातील सुधारित आकृतीबंधास मंजुरी देण्यात आली असून राज्यात नवीन कार्यालयांच्या निर्मितीस मान्यता देण्यात आली आहे. त्याअंतर्गत नांदेड येथे नवीन उपसंचालक, भूमी अभिलेख कार्यालयाच्या मुख्यालयाबाबत ठोस निर्णय घेण्यात आला आहे.

या संदर्भात खा. डॉ. अजित गोपछडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन मागणीसाठी निवेदन सादर केले होते. पूर्वी छत्रपती संभाजी नगर येथे असलेले मुख्यालय हे दळणवळणासाठी नांदेड, लातूर, हिंगोली आणि धाराशिवसाठी दूर होते. त्यामुळे नांदेड येथे हे मुख्यालय व्हावे यासाठी खा. डॉ. गोपछडे यांनी यशस्वी पाठपुरावा केला आहे. नांदेड हे हिंगोली, लातूर आणि धाराशिव या (पान ३ वर...)




**नांदेड :** अखिल भारतीय विक्रेता संघटनेकडून (एमआयसीडी) बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री तसेच कार्पोरेटद्वारे अव्यावसायिक स्पर्धेविरोधात बुधवारी देशव्यापी बंद पुकारण्यात आला. त्या अनुषंगाने नांदेड येथे अखिल भारतीय औषध विक्रेते यांनी बंद पाळून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून निवेदन दिले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष शंतनू कोडगिरे, दीपक कोठारी, दीपक पावडे व पदाधिकारी दिसत आहेत. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# भाषेचे राजकारण: परिणामाकडे दुर्लक्ष

भाषा हा केवळ संवादाचा विषय नाही; ती संस्कृती, इतिहास आणि ओळखीचा आधार असते. म्हणूनच भाषेच्या धोरणात संवेदनशीलता आवश्यक आहे. केंद्र सरकारने केवळ धोरण जाहीर करून थांबून चालणार नाही, तर राज्याच्या भावनांचा आदर राखत संवाद साधणे आवश्यक आहे. भाषेच्या प्रश्नात विश्वास निर्माण करणे हीच सर्वात मोठी गरज आहे. अन्यथा शिक्षणाच्या नावाखाली पुन्हा एकदा प्रादेशिक अस्मिता आणि केंद्र-राज्य संघर्षाचे राजकारण तापण्याची भीती नाकारता येत नाही. सध्या अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने तीन-भाषा सूत्राची अंमलबजावणी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. वरकरणी हा निर्णय शैक्षणिक वाटत असला, तरी त्यामागे भारताच्या राजकीय आणि सांस्कृतिक इतिहासातील एक संवेदनशील प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. तो आहे भाषा आणि अस्मिता यांच्या बद्दल. विशेषतः दक्षिण भारतात, आणि त्यातही तामिळनाडूमध्ये भाषेचा मुद्दा हा केवळ शिक्षणाचा विषय राहिलेला नाही; तो स्वाभिमान, प्रादेशिक ओळख आणि केंद्राच्या वर्चस्वाविरोधातील संघर्षाशी जोडला गेला आहे. तामिळनाडूमधील हिंदीविरोध हा अचानक निर्माण झालेला नाही. त्याची मुळे द्रविड चळवळीच्या शतकभराच्या इतिहासात आहेत. १९६० च्या दशकात झालेल्या हिंदीविरोधी आंदोलनांनी राज्याच्या राजकारणाला निर्णायक वळण दिले. द्रविड पक्षांनी याच आंदोलनांच्या बळावर सत्तेचा मार्ग तयार केला आणि आजही त्या भावना तितक्याच प्रभावी आहेत. त्यामुळे केंद्र सरकार तीन-भाषा सूत्र लवचिक आहे, कोणतीही भाषा सक्तीची नाही, असे कितीही स्पष्ट करत असले तरी तामिळनाडूमध्ये त्याकडे संशयाच्या नजरेनेच पाहिले जाते. मात्र, आजची परिस्थिती १९६० च्या दशकापेक्षा वेगळी आहे. आर्थिक वास्तवाने लोकांच्या भाषिक दृष्टिकोनात बदल घडवून आणला आहे. इंग्रजी ही रोजगार, जागतिक संधी आणि आधुनिक शिक्षणाची भाषा बनली आहे. त्याचवेळी हिंदीने चित्रपट, दूरचित्रवाणी, डिजिटल माध्यमे, स्थलांतर आणि व्यापार यांच्या माध्यमातून देशभर व्यावसायिक महत्त्व प्राप्त केले आहे. दक्षिण भारतातील अनेक तरुण हिंदीला विरोध करत असले तरी व्यवहारात ते हिंदी चित्रपट पाहतात, सोशल मीडियावर हिंदी वापरतात आणि रोजगारासाठी हिंदीशी संपर्क ठेवतात. म्हणजेच, भाषेविषयीचे राजकीय मत आणि सामाजिक व्यवहार यांच्यात आता एक प्रकारची दरी निर्माण झाली आहे. तीन-भाषा सूत्राचा उद्देश बहुभाषिक भारतात विद्यार्थ्यांना विविध भाषा शिकवून त्यांची संवादक्षमता वाढवणे हा आहे. परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या पातळीवर अनेक प्रश्न उभे राहतात. उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये हिंदी आधीच संपर्कभाषा असल्याने तेथे हे धोरण सहज राबवता येईल. पण ईशान्य भारत किंवा दक्षिणेतील राज्यांमध्ये स्थानिक भाषा, इंग्रजी आणि तिसरी भाषा यामध्ये समतोल राखणे कठीण ठरू शकते. प्रत्येक राज्याची सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी वेगळी असल्याने एकाच सूत्राची सर्वत्र समान अंमलबजावणी शक्य नाही. याहून गंभीर प्रश्न म्हणजे पायाभूत सुविधांचा. भारतात बहुभाषिक शिक्षणासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षित शिक्षक आहेत का? अनेक सरकारी शाळांमध्ये आजही मूलभूत साक्षरतेचे प्रश्न कायम आहेत. गणित, विज्ञान आणि मातृभाषेतील शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्याचे आव्हान असताना अतिरिक्त भाषांचे ओझे विद्यार्थ्यांवर टाकणे कितपत योग्य ठरेल? प्रशिक्षित शिक्षक, योग्य अभ्यासक्रम आणि प्रभावी अध्यापन पद्धती नसतील तर बहुभाषिक शिक्षण हे केवळ औपचारिकता ठरेल. त्याचा सर्वाधिक फटका ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना बसू शकतो. उच्चभ्रू शहरी शाळांमध्ये बहुभाषिक शिक्षणाची सुविधा सहज उपलब्ध होईल, पण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ते आणखी एक शैक्षणिक दडपण बनण्याची शक्यता आहे. भारताची खरी ताकद विविधतेत आहे. त्या विविधतेचा सन्मान राखत विद्यार्थ्यांना अधिक सक्षम बनवणारे शिक्षण धोरण घडवणे ही काळाची गरज आहे. भाषांचे ज्ञान वाढणे स्वागतार्हच आहे; परंतु कोणत्याही भाषेची सक्ती किंवा त्याचा आभासही लोकशाही व्यवस्थेसाठी धोकादायक ठरू शकतो. तीन-भाषा सूत्र यशस्वी व्हायचे असेल, तर ते विश्वास, समन्वय आणि व्यवहार्यतेच्या आधारावर उभे राहिले पाहिजे अन्यथा इतिहासातील जखमा पुन्हा उघडण्याचा धोका कायम राहील.

# भारतीय माहिती क्रांतीचे जनक राजीव गांधी



आज २१ मे, भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा आज ३५ वा स्मृतीदिन. राजीव गांधी यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हटले जाते. आधुनिक विचार आणि कठोर निर्णयामुळे राजीव गांधी यांनी जगात भारताची वेगळी ओळख निर्माण केली. २० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी राजीव गांधी हे भारताचे पंतप्रधान बनले. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांचे ज्येष्ठ सुपुत्र असलेले राजीव यांना राजकारणात रस नव्हता. देशातील सर्वात प्रतिष्ठित राजकीय घराण्यात जन्म घेऊनही राजीव गांधी हे राजकारणापासून दूरच होते.

राजीव गांधी यांचे शिक्षण डेहराडूनच्या शाळेत झाले. त्यानंतर ते हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या डुनच्या निवासी शाळेत दाखल झाले. तिथे त्यांना अनेक मित्र भेटले. या मित्रांशी त्यांनी आयुष्यभर मैत्री जपली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते केम्ब्रिजच्या ट्रीनीटी महाविद्यालयात गेले, पण लवकरच लंडन स्थित इम्पेरियल महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास केला. त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान या विषयात खूप रस होता. ते या विषयाची पुस्तके वाचून काढत. विमान उड्डाण करून आकाशात उडावे अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी वैमानिक होण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडमध्ये त्यांनी फ्लायिंग क्लबची परीक्षा दिली आणि वैमानिक बनले. लगेचच ते इंडियन एअर लाईन्सचे देशांतर्गत सेवेचे वैमानिक बनले. लंडन-मध्येच त्यांची आणि सोनिया गांधी यांची मैत्री झाली. मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि १९६८ साली त्यांचा विवाह झाला.

राजीव गांधी हे अपघातानेच राजकारणात आले. १९८० साली राजीव गांधी यांचे बंधू संजय गांधी यांचा अपघातात मृत्यू झाला. संजय गांधी यांच्या मृत्यूनंतर राजीव गांधी यांनी राजकारणात प्रवेश करावा अशी मागणी काँग्रेसमधील नेत्यांकडून होऊ लागली. आई इंदिरा गांधी यांनीही राजीव गांधी यांना राजकारणात उतरण्याची सूचना केली. तेंव्हा राजीव यांनी आपल्या भावाच्या संजय गांधी यांच्या अमेठी या मतदारसंघातून निवडणूक लढवली व मोठ्या मताधिक्याने ती जिंकली. १९८२ साली दिल्लीत भारताने आशियाई क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धेच्या नियोजनाची सर्व जबाबदारी राजीव गांधी यांच्याकडे होती. त्यांनी ती यशस्वीरीत्या पेलून ही स्पर्धा यशस्वी केली.

३१ नोव्हेंबर १९८४ इंदिरा गांधी यांची हत्या झाली. हत्या झाली तेंव्हा इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या. त्यामुळे मोठा घटनात्मक पेच निर्माण झाला. पंतप्रधानपदासारखे देशातील सर्वोच्च पद जास्त दिवस रिक्त ठेवता येणार नाही असे घटना तज्ज्ञांचे मत होते. त्यामुळे त्यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. वैयक्तिक पातळीवर दुःख असूनही त्यांनी पंतप्रधान पदाची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेस पक्षाला एकतर्फी विजय मिळवून दिला. या निवडणुकीत काँग्रेसला ४०० हुन अधिक जागा मिळाल्या. स्वतः राजीव गांधी हे विक्रमी मतांनी जिंकून आले होते. पंतप्रधान असताना त्यांनी देशात अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. देशाला महासत्ता व्हायचे असेल तर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशाने प्रगती करायला हवी असे त्यांचे मत होते. २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे असेल त्यासाठी देशातील प्रत्येक तरुण हा संगणक साक्षर असायला हवा असा त्यांचा आग्रह होता. त्यामुळेच त्यांनी देशात संगणक आणला.

राजीव गांधी जेंव्हा संगणकावर बोलत होते तेंव्हा अनेकजण त्यांच्यावर टीका करत होते. पण संगणक क्रांती आणणार हा ध्यास त्यांनी घेतला होता. राजीव गांधींमुळेच सर्वसामान्य घरात संगणक पोहचला. राजीव गांधी यांनी घेतलेल्या एका निर्णयामुळे ८ टक्के म्हणजे तेरा लक्ष कोटींचा माहिती तंत्रज्ञान उद्योग उभा राहिला. यातून पन्नास लाख लोकांना थेट रोजगार मिळतो आहे. माहिती प्रधान सभ्यता, ज्ञान प्रधान सभ्यता, बुद्धिमत्ता प्रधान सभ्यता या तीन क्रांतीची पायाभरणी राजीव गांधी यांनी केली. त्याचीच फळे आज भारत देश चाखतो आहे. राजीव गांधी यांच्या दूरदृष्टीमुळे भारताचा वेगाने विकास झाला आणि लोकांचे जीवनमान उंचावले. स्वभावाने गंभीर पण आधुनिक विचाराच्या राजीव गांधी यांनी देशात माहिती तंत्रज्ञान युगाची मुहूर्तमेढ रोवली त्यामुळेच त्यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हणतात.

राजीव गांधी यांनी दूरसंचार क्रांती बरोबरच नवे शैक्षणिक धोरण आणून देशभरात नवोदय विद्यालयाची स्थापना केली. त्यासोबतच पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून महिलांना राजकारणात मोठी संधी दिली. राजीवजींनी घेतलेले हे निर्णय भारताच्या जडणघडणीत आणि विकासात मैलाचा दगड ठरले आहेत. भारत देशाला राजीव गांधी यांनी तंत्र वैज्ञानिक दृष्टी दिली. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील महाशक्ती बनवून भारताला स्वाभिमान दिला. पुढच्या पन्नास वर्षाचा अर्थव्यवस्थेचा पाया राजीव गांधी यांनी त्यावेळेला रचला होता त्यामुळेच आपण आज इथपर्यंत पोहचू शकलो.

देशाला माहिती तंत्रज्ञानात परिपूर्ण करून महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या पंतप्रधानाचे २१ मे १९९१ रोजी लिट्टे या दहशतवादी संघटनेने मानवी बॉम्बचा वापर करून हत्या केली म्हणून आजचा दिवस देशभर दहशतवादी विरोधी दिवस म्हणूनही पाळण्यात येतो. राजीव गांधी यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# दहशतवाद आणि हिंसाचारमुक्त समाज : काळाची गरज



२१ मे हा दिवस भारतामध्ये 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन' म्हणून पाळला जातो. हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील अत्यंत वेदनादायी घटनेची आठवण करून देणारा आहे. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस साजरा केला जातो. २१ मे १९९१ रोजी तामिळनाडूमधील श्रीपेरंबुदूर येथे निवडणूक प्रचारसभेदरम्यान झालेल्या आत्मघाती बॉम्बस्फोटात त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला होता. त्या घटनेनंतर भारत सरकारने समाजात दहशतवाद आणि हिंसाचाराविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी २१ मे हा दिवस 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन' म्हणून घोषित केला. या दिवसाचा उद्देश केवळ एका नेत्याच्या स्मृतींना अभिवादन करणे नाही, तर समाजामध्ये शांतता, बंधुता, सहिष्णुता आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे हा आहे. आजच्या अस्थिर आणि तणावपूर्ण जगात या दिवसाचे महत्त्व अधिक वाढलेले दिसून येते.

मानवजातीच्या इतिहासावर दृष्टिक्षेप टाकला असता संघर्ष, युद्धे आणि हिंसा यांचे अनेक संदर्भ आढळतात. प्राचीन काळात भूभाग विस्तारासाठी युद्धे केली जात होती. मध्ययुगात धर्माच्या ना-वाखाली रक्तपात झाला. आधुनिक युगात राष्ट्रवाद, आर्थिक विषमता, राजकीय स्वार्थ, धार्मिक कट्टरता आणि जातीयवादामुळे हिंसाचाराला खतपाणी मिळाले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जगाला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेले असले, तरी मानवी मनातील द्वेष, सूडभावना आणि असहिष्णुता पूर्णपणे नाहीशी झालेली नाही. उलट आधुनिक तंत्रज्ञानामुळे दहशतवाद अधिक संघटित, आक्रमक आणि घातक बनला आहे. आज दहशतवादी संघटना इंटरनेट, सोशल मीडिया, आर्थिक नेटवर्क आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रांच्या मदतीने जगभरात भयाचे वातावरण निर्माण करत आहेत. त्यामुळे दहशतवाद हा केवळ एका देशापुरता मर्यादित प्रश्न राहिलेला नसून संपूर्ण मानवजाती-समोरील गंभीर आव्हान बनला आहे.

दहशतवाद म्हणजे राजकीय, धार्मिक, सामाजिक किंवा वैचारिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हिंसा, धमकी आणि भीतीचा वापर करणे होय. दहशत-वादी संघटना समाजामध्ये अस्थिरता निर्माण करण्यासाठी निरपराध नागरिकांना लक्ष्य करतात. बॉम्बस्फोट, आत्मघाती हल्ले, गोळीबार, अपहरण, रेल्वे किंवा विमानांवरील हल्ले, धार्मिक स्थळांवरील आक्रमणे आणि सायबर हल्ले अशा विविध मार्गांनी दहशतवादी कारवाया घडवून आणल्या जातात. हिंसाचार ही केवळ शारीरिक हानीपुरती मर्यादित गोष्ट नाही. मानसिक, सामाजिक आणि वैचारिक स्तरावरही हिंसा घडू शकते. एखाद्याला धमकावणे, द्वेष पसरवणे, अफवा निर्माण करणे किंवा समाजात भीतीचे वातावरण तयार करणे हे देखील हिंसेचेच प्रकार आहेत. त्यामुळे दहशतवाद हा केवळ सुरक्षाव्यवस्थेचा प्रश्न नसून तो सामाजिक, मानसिक आणि नैतिक मूल्यांशी संबंधित गंभीर विषय आहे.

दहशतवाद आणि हिंसाचार रोखण्यासाठी शिक्षण अत्यंत प्रभावी माध्यम ठरू शकते. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणा-पासूनच शांतता, सहिष्णुता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण केली पाहिजे. शिक्षणामुळे विवेकशीलता विकसित होते आणि युवक चुकीच्या प्रवृत्तीं पासून दूर राहतात. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, मानवता आणि सामाजिक जबाबदारी यांवर आधारित उपक्रम राबविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी विविध धर्म, संस्कृती आणि विचारांचा आदर करण्याची वृत्ती विकसित केली पाहिजे.

भारत देशात महात्मा गौतम बुद्ध, भगवान महावीर, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगाला अहिंसेचा महान संदेश दिला. सत्य, प्रेम आणि शांततेच्या माध्यमातून संघर्ष सोडविण्याचा मार्ग त्यांनी दाखवून दिला. गांधीजींच्या मते हिंसा तात्पुरता विजय मिळवून देऊ शकते; परंतु दीर्घकालीन शांतता आणि मानवतेचे रक्षण केवळ अहिंसेतूनच शक्य आहे. आजच्या काळात गांधीजींचे विचार अधिक महत्त्वाचे वाटतात. हिंसेला हिंसेने उत्तर दिल्यास द्वेष वाढतो; परंतु संवाद, सहकार्य आणि समजूतदारपणातून समाजात सलोखा निर्माण होतो.

कुटुंब व्यवस्थेची भूमिकाही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मुलांमध्ये नैतिक मूल्ये, सहनशीलता, परस्पर आदर आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे कार्य कुटुंबातूनच सुरू होते. पालकांनी मुलांच्या वर्तनाकडे लक्ष देणे, त्यांच्याशी संवाद साधणे आणि योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. आज अनेक युवक सोशल मीडियाच्या प्रभावाखाली येतात. चुकीच्या विचारसरणीचा प्रभाव पडू नये यासाठी कुटुंबातील वातावरण सकारात्मक असणे गरजेचे आहे. युवकांना योग्य दिशा मिळाली तर ते राष्ट्रनिर्मितीत महत्त्वाचे योगदान देऊ शकतात.

भारत सरकार आणि विविध सुरक्षा यंत्रणा दहशतवाद रोखण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. सैन्यदल, पोलिस, गुप्तचर संस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणा देशाच्या सुरक्षेसाठी दिवस-रात्र कार्यरत असतात. सीमावर्ती भागांमध्ये सुरक्षा मजबूत करण्यात आली आहे. दहशतवादी कारवायांवर नियंत्रण मिळवण्यासाठी कठोर कायदे करण्यात आले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरही विविध देश एकत्र येऊन दहशतवादाविरोधात सहकार्य करत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाने दहशतवादाला जागतिक शांततेसाठी गंभीर धोका मानले आहे.

धर्म हा मुळात प्रेम, करुणा आणि मानवतेचा संदेश देतो. कोणताही धर्म हिंसा शिकवत नाही. परंतु काही कट्टरवादी शक्ती धर्माचा चुकीचा अर्थ लावून लोकांना भडकवतात. त्यामुळे धार्मिक सहिष्णुता आणि परस्पर आदर वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. विविध धर्मांचे लोक एकत्र येऊन शांतता आणि बंधुभावाचा संदेश देतील, तर समाज अधिक मजबूत होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित भारतीय संविधानाने सर्व धर्मांना समान आदर दिला आहे. 'सर्वधर्मसमभाव' ही भारतीय संस्कृतीची परंपरा आहे. या मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

शाळा आणि महाविद्यालयांमध्ये दहशतवादविरोधी शपथ, व्याख्याने, चर्चासत्रे, निबंध स्पर्धा, रॅली आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक जाणीव आणि शांततेची भावना निर्माण होते. युवकांनी संविधानिक मूल्यांवर विश्वास ठेवून शांततेच्या मार्गाने समस्या सोडविण्याची वृत्ती विकसित केली पाहिजे. युवक हे राष्ट्राचे भविष्य आहेत. त्यांच्यामध्ये अपार ऊर्जा आणि क्षमता आहे. ही ऊर्जा सकारात्मक दिशेने वळविणे अत्यंत आवश्यक आहे.

भारत हा शांतता, लोकशाही आणि सहिष्णुतेवर विश्वास ठेवणारा देश आहे. अनेक संकटांनंतरही भारताने लोकशाही आणि राष्ट्रीय एकात्मता टिकवून ठेवली आहे. हे भारतीय समाजाच्या सामर्थ्याचे प्रतीक आहे. विविधतेत एकता जपणारा भारत जगासाठी आदर्श ठरू शकतो. मात्र, त्यासाठी समाजातील द्वेष, असहिष्णुता आणि हिंसक प्रवृत्ती दूर करणे आवश्यक आहे.

२१ मे रोजी साजरा होणारा दहशत-वाद व हिंसाचार विरोधी दिन आपल्याला शांततेचा, मानवतेचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देतो. या दिवशी आपण सर्वांनी हिंसेचा त्याग करून प्रेम, सहकार्य आणि बंधुभावाचा मार्ग स्वीकारण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. शिक्षण, सामाजिक न्याय, आर्थिक विकास, नैतिक मूल्ये आणि मानवतेच्या माध्यमातूनच दहशतवाद आणि हिंसाचारमुक्त समाजाची निर्मिती शक्य आहे. अहिंसा, सत्य, बंधुता आणि मानवता या मूल्यांवर आधारित समाजच खऱ्या अर्थाने प्रगत आणि समृद्ध होऊ शकतो. त्यामुळे दहशतवाद आणि हिंसाचाराविरोधात एकजुटीने उभे राहून शांततामय, सुरक्षित आणि सुसंस्कृत भारत घडविणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली
मो. ९९६०१०३५८२

# सैन्यात सर्वांनी जायलाच हवं?

सैन्यात सर्वांनी जायला हवं. परंतु बरीचशी मंडळी सैन्यात जात नाहीत. समजतात की, सैनिकांना केव्हा मरण येईल हे सांगता येत नाही. शिवाय त्याची पात्रता परीक्षा कठीण असते. त्यातच जो सैनिक असतो, त्याला नोकरी असताना व ते निवृत्त झाल्यानंतर सन्मान मिळत नाही. त्यातच कोणी आपली उच्च वेतनाची देशांतर्गत असलेली नोकरी सोडून जात नाहीत सैन्यात. सैन्यात जायला हिंमत लागते. मानसिकताही लागते आणि तेवढीच महत्वाकांक्षा. कारण सैन्यात गेल्यानंतर शत्रू सैनिकांच्या हातात पडल्यास एवढे हाल होतात. त्यातूनही प्रत्यार्पणासाठी विशेष प्रयत्न केले जात नाहीत. संभाजी महाराज हे एक सैनिकच होते. आपल्या स्वराज्यासाठी लढणारे. ते जेव्हा शत्रूच्या हातात पडले. तेव्हा त्यांचे अनन्वित हाल झाले. त्यांना त्यातून सोडविण्याचे पुरेसे प्रयत्न झाले नाहीत. हेच पाहतात आजचे तरुण. म्हणूनच कोणीही सैन्यात नोकरी करायला तयार होत नाहीत.

देशात सैनिक तयार व्हायलाच हवेत. त्या सेवेत तरुणांनी जायलाच हवं. परंतु प्रत्येक तरुण सैन्यात जातो काय? तो जात नाही. जायला धजत नाही. कारण असतं युद्ध. युद्ध झालंच तर केव्हा कोणत्या सैनिकाचा जीव जाईल ही गोष्ट नाकारता येत नाही.

अलिकडील काळात मायबापाचीच सेवा होत नाही. त्यातच लोकं मायबापांनाही काय दिलं मला. असा जबाब विचारतात व त्यांची म्हातारपणात सेवा करतांना मोकळे होतात. बरीच-शी मुलं अशी आहेत की, ती आपल्या मायबापाला सोडून, त्यांनी केलेले त्यांच्यावरील उपकार विसरुन आपल्या पत्नीसोबत वेगळे राहायला निघून जातात. त्यात मी, माझी पत्नी व माझी मुलं एवढाच त्यांचा संसार असतो.

मायबापाची सेवा. जे मायबाप आपल्या बाळाला उन्हातून सावलीत नेतात. अनमोल महागडे शिक्षण शिकवितात. मुलं त्यांचीच जिथं होत नाही. ती मुलं देशाची का होतील? तसं पाहिल्यास देशाची सेवा महत्वपूर्ण. परंतु मोबदला कमविण्याच्या नादात असलेली मुलं प्रसंगी साध्या मंदिराच्या नावावर वस्तीत वर्गणी गोळा तर करतात. परंतु सेवा करण्याऐवजी गोळा झालेल्या पैशातून तीच मुलं आपल्या शौकाकडे लक्ष ठेवून मंदिरात दानात आलेल्या पैशातून दारु ढोसतात. ही वास्तविकता आहे. ती मुलं देशाची सेवा कशी करतील? ती मुलं देशाची सेवा करायला मागेपुढे पाहात असतात.

नोकरी तिही साधी सोपी व कमी वेतनाची नाही. चांगल्या वेतनाची. तसं पाहिल्यास आजच्या काळात कोणीही कधीही नोकरी मिळवीत असतांना सैन्यात नोकरी मिळवीत नाही. जातच नाहीत व म्हणतात की सैन्यात गेलोच तर भविष्य अंधकारमय आहे. सैन्यातील व्यक्ती हा जास्त दिवस जीवंत राहीलच ही शाश्वती देता येत नाही. ते नोकरी मिळवितात देशा-तीलच अंतर्गत बाबींतील. तशीच त्या एका व्यक्तीला नोकरी मिळाली. जी इंजिनिअरची होती. त्यात वेतन भरपूर होतं. प्रथमेश त्याचं नाव. प्रथमेशला सैन्यात जायचं होतं. ती आस आणि आवड त्याला लह-ानपणापासूनच होती.

प्रथमेशला नोकरी लागली. तो इंजिनिअर बनला. वेतनही भरपूर होतं. परंतु तिथं मन मानलं नाही. तसं पाहिल्यास सैन्यात नोकरी करणे. ही बाब देशाच्या एका महत्वपुर्ण सेवेत समाविष्ट होतो. त्यानंतर त्यानं अर्ज भरला व तो पंचवीसव्या वर्षी सैन्यात लेफ्टनंट अधिकारी पदावर कार्यरत झाला.

देशसेवेसाठी नाही तर सैन्यात जाण्यासाठी प्रथमेशनं आपल्या भक्कम व सुखी जीवनाच्या नोकरीचा त्याग केला. ही बाब देशातीलच इतर लोकांसाठी प्रेरणादायी बाब आहे. प्रथमेशनं दाखवून दिलं की व्यक्ती आणि त्याचा पगार महत्वपूर्ण नाही तर महत्वपूर्ण आहे देशाची सेवा. ही देशाची सेवा करतांना वीरमरण जर आलं तर ते वीरमरण शहिदात गणलं जाईल अन् देशात राहात असतांना व जीवन जगत असतांना कितीही वेतन मिळालं आणि समजा एखाद्यावेळेस मरण आलंच तर ते मरण वीरमरणात समाविष्ट होणार नाही. शिवाय मरण हे कधी ना कधी येणारच आहे. मग सैन्यातील नोकरी नाही पत्करली तरीही. त्यापेक्षा सैन्यात नोकरी पत्करणं बरं. परंतु आज सैन्यात कोणी जायला तयार होत नाहीत. विचार वेगळाच असतो. विचार मरणाचाच असतो. शिवाय जर जास्त वेतनाची नोकरी देशातंर्गत असेल तर कोणीच देशाची सेवा करायला व जीव धोक्यात घालायला तयार होतच नाही. त्याचं कारण म्हणजे सैन्यात असलेला त्रास. शिवाय ही देशसेवा करणाऱ्या व्यक्तीचा देशांतर्गत भागात सन्मान व्हायला हवा. परंतु तसा सन्मान प्रत्येकांचा होताना दिसत नाही. ते करीत असलेली त्यांची नोकरी विशेष असली तरी लोकं त्यांना सामान्य लोकांसारखंच समजतात नव्हे तर सामान्य लोकांसारखंच वागवतात. ज्यातून ही नोकरी करायला तरुण पुढे येत नाहीत. शिवाय ही नोकरी पत्करल्यानंतर समजा दुर्दैवानं एखाद्यावेळेस एखादा सैनिक शत्रूराष्ट्राला सापडलाच तर त्याचे एवढे हालहाल होतात. ही विचारात घेण्यालायक बाब असते. तेव्हा त्या सैनिकांबाबत विचार करतांना पुरेसे प्रत्यार्पणाचे प्रयत्न होत नाहीत. ज्यातून अशा सैनिकांना हेर समजून त्याला अनन्वित जीवघेण्या यातना मिळत असतात. व्यतिरिक्त सांगावेसे वाटते की अशा सैनिकांचे परत आपल्या मातृभुमीत परतणे कठीण असते.

विशेष सांगायचं म्हणजे आपण म्हणतो की देशात सैनिक तयार व्हायला हवेत. परंतु असे सैनिक तयार झाल्यानंतर आपण त्यांना खरंच सन्मान देतो का? हा एक गंभीर प्रश्न आहे. याचे उत्तर नाही असंच येतं. शिवाय त्यांची सैन्यात जेव्हा नियुक्ती होते. तेव्हा तर पात्रतेसाठी त्यांना बरीच मेहनत करावी लागते. सैन्यात नोकरीसाठी पात्र होत असतांना कितीतरी वेळा चाबकाचे फटके खावे लागतात. कितीतरी वेळ अपमान सहन करावा लागतो. शिव्यांची लाखोली खावी लागते. पात्र होत असतांना या सर्व गोष्टी घडतात आणि त्या गोष्टी घडणंही बरोबरच आहे. कारण अशा गोष्टी जर पात्रतेच्या वेळेस घडल्या नाहीत तर तो शत्रूच्या गोटात सापडलाच तर त्याला दिल्या जाणाऱ्या वेदना, ती शिव्यांची लाखोली आणि ते अपमानास्पद शब्द तो सहन करु शकणार नाही. हा उद्देश.

महत्वाचं सांगायचं झाल्यास देशात सैन्यात सर्वांनी आनंदानं जायला हवं. कारण ती एक सेवा आहे. देशाची सेवा. जर वीरमरण आलंच तर ती दुःखाची बाब मानू नये. ती आनंदाचीच बाब मानावी सर्वांनी. सैनिक तयार व्हायलाच हवेत. देशाला त्याची गरज आहे. अन् ते होतीलही. जेव्हा ते सैनिक असतांना वा त्यातून निवृत्त झाल्यानंतर त्यांना विशेष असा सन्मान मिळेल. त्यांचा दर्जा टिकून राहील. तेव्हाच खऱ्या अर्थानं सैनिक बनल्याचं सार्थक वाटेल. यात शंका नाही.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# राष्ट्रीय महामार्गाच्या दुरावस्थेची गडकरींकडून दखल

## सरसम-कोठारी रस्त्याच्या गुत्तेदाराला काळ्या यादीत टाकण्याचे आदेश

**किनवट (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय महामार्गाच्या सुमार दर्जाच्या कामामुळे अल्पावधीतच रस्त्याची मोठी दुरावस्था झाली. या संदर्भात आ. भीमराव केराम यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे लक्ष वेधले असता मंत्री गडकरी यांनी या बाबीची गंभीर दखल घेत संबंधित गुत्तेदाराला काळ्या यादीत टाकून त्याच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. नवी दिल्ली येथे बुधवार, दि. २० रोजी आ. भीमराव केराम यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेत धनोडा, भोकर राष्ट्रीय महामार्गाच्या दुरावस्थेबाबत सविस्तर चर्चा केली.



यावेळी सरसम ते कोठारी दरम्यानच्या रस्त्यावरील मोठमोठे खड्डे, भेगा तसेच निकृष्ट दर्जाच्या कामाचे फोटो व व्हीडीओ त्यांनी गडकरी यांना दाखविले. या मार्गावर वारंवार होत असलेल्या अपघातांची माहिती देत नागरिकांच्या जीवितास निर्माण झालेला धोका देखील त्यांनी निदर्शनास आणून दिला. रस्त्याची अवस्था पाहून संतप्त झालेल्या गडकरी यांनी तत्काळ महाराष्ट्र राष्ट्रीय महामार्ग विभागाचे मुख्य अभियंता तथा नॅशनल हायवे प्राधिकरणाचे अध्यक्ष अभियंता संतोष शेलार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. संबंधित गुत्तेदाराला तातडीने काळ्या यादीत टाकून त्याच्यावर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी दिल्याचे सांगण्यात आले आहे.

तसेच सरसम ते कोठारी या रस्त्याचे नव्याने टेंडर काढून काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. धनोडा-भोकर मार्ग हा विदर्भ आणि मराठवाड्याला जोडणारा महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग असून, गेल्या काही महिन्यांपासून या मार्गावरील निकृष्ट दर्जाच्या कामामुळे वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ठिकठिकाणी पडलेले खड्डे, उखडलेला डांबरीकरणाचा थर आणि रस्त्यावर पडलेल्या भेगांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून, नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात होता. दरम्यान, या रस्त्याच्या दर्जेदार दुरुस्तीसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात तसेच नागरिकांना सुरक्षित आणि चांगला रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आ. भीमराव केराम यांनी यावेळी केली.

मंत्री गडकरी यांनीही या प्रकरणात कठोर भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.


# पतंजली नांदेडतर्फे जागतिक योग दिनाची जय्यत तयारी



**नांदेड (प्रतिनिधी)** –पतंजली योग परिवार नांदेडतर्फे १२ व्या जागतिक योग दिनाच्या जय्यत तयारीसाठी अशोक नगर हनुमान मंदिर येथे कार्यकर्ता बैठक घेण्यात आली. पतंजलीच्या प्रत्येक योगशिक्षक विद्यालय, महाविद्यालय, निवासी वसतिगृह, खाजगी तसेच सरकारी ऑफिस, बँक आदी ठिकाणी एक, तीन, पाच तसेच सात दिवसीय निशुल्क योग शिबिराचे आयोजन करणार आहे.

तसेच प्रत्येक तहसील स्तरावर जागतिक योग दिनानिमित्त निशुल्क योग शिबिरे घेण्यात येणार आहे. अशा पद्धतीने जागतिक योग दिनाची संकल्पना राबवण्यासाठी ५०१ ठिकाणी जिल्हास्तरावर योग शिबिरे घेण्यात येणार आहेत. या नियोजनासाठी सर्वश्री पंढरीनाथ कंठेवाड, राम शिवपनोर, नागनाथ पाटील बिलोलीकर, महारुद्र माळगे, सुरेश लंगडापुरे, अनिल कदम, हरिहर नरवाडे, सदाशिव बुटले पाटील, शैलेंद्र नावडे, भरत टेकाळे, जनार्दन आठवले, व्यंकट कोटगिरे, हनुमंत ढगे, दिलीप आघाव, बालाजी कहाळेकर, राजू शेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते, असे अनिल अमृतवार यांनी सांगितले.

# संभाजी तिडके लिखित 'संतांची शिकवण'चा प्रकाशन सोहळा




**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – कवी, लेखक प्रा. संभाजी तिडके लिखित संतांची शिकवण या ग्रंथाचे प्रकाशन २४ मे रोजी सकाळी ११ वाजता गोविंद गार्डन हडको येथे करण्यात येणार आहे.

या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. शिवाजीराव शिंदे हे राहणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त शिक्षण संचालक गोविंद नांदेडे, प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर, शारदा भवन शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष ॲड. उदयराव निंबाळकर, अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य देवीदास फुलारी, प्रसिद्ध ग्रामीण कथाकार शंकर वाडेवाले, ग्रामीण साहित्यिक महेश मोरे यांची उपस्थिती राहणार आहे.

या प्रकाशन सोहळ्याचे सूत्रसंचालन प्रा. धाराशिव शिराळे हे करणार असून, या प्रकाशन सोहळ्याला साहित्यिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी कैलास तिडके व इसाप प्रकाशनचे संचालक दत्ता डांगे यांनी केले आहे.

# नांदेड जिल्हा अर्बन बँक असोसिएशनच्यावतीने 'सायबर क्राईम व त्यावरील उपाय' विषयावर मार्गदर्शन

**नांदेड (प्रतिनिधी)** – दि नांदेड जिल्हा अर्बन को-ऑप. बँक असोसिएशनच्यावतीने सायबर क्राईम व त्यावरील उपाययोजना या विषयावर मार्गदर्शदनपर व्याख्यान भाग्यलक्ष्मी बँकेचे मुख्य कार्यालय नवा मोंढा येथे संपन्न झाले.

सद्यस्थितीमध्ये सायबर क्राईमचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून, त्याचा धोका आज ना उद्या कोणत्याही बँकांना होऊ शकतो. हा संभाव्य धोका टाळण्याच्या मुख्य उद्देशाने या मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पुणे येथील सायबर क्राईम विषयातील तज्ज्ञ डॉ. संजय तुंगार यांनी सायबर गुन्हे, इनव्हॉईस फ्रॉड, ईमेल ब्लॅकमेलिंग, व्हॉईस फिक्सींग कसे केले जातात व त्यावरील उपाय यावर सखोल मार्गदर्शन केले. प्रशिक्षित संचालक मंडळ, जागरूक कर्मचारी वर्ग तसेच अत्याधुनिक आयटी



विभाग हे अतिशय महत्वाचे घटक असून, ग्राहकांना देखील कार्यशाळेद्वारे प्रशिक्षित करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन डॉ. संजय तुंगार यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोदावरी अर्बन बँकेचे अध्यक्ष तथा बँक असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. डॉ. आर. डी. देशमुख हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून असोसिएशनचे उपाध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, लक्ष्मणराव संगेवार, प्रभाकर महाजन, सिमाताई अतनूरकर आदी उपस्थित होते. शंकर नागरी सहकारी बँकेचे सीईओ तथा असोसिएशनचे सचिव विक्रम राजे, भाग्यलक्ष्मी बँकेचे सीईओ प्रतिभा पराडकर, नांदेड मर्चंट बँकेचे सीईओ सनतकुमार बनवसकर, मार्कंडेय बँकचे सीईओ गंगाधर शिंदे, गोदावरी अर्बन बँकेचे सीईओ कांचन परीहार तसेच नांदेड जिल्ह्यातील नागरी बँकांचे पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिवदास चंदापूरे यांनी केले. आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी आजपासून दोन दिवसीय मार्गदर्शनपर प्रशिक्षण शिबीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषदेच्या वतीने पुढील सहा महिन्यांत विविध विभागांतून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी 'सेवानिवृत्ती आणि सेवानिवृत्तीनंतरचे जीवन' या विषयावर दोन दिवसीय मार्गदर्शनपर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम गुरुवार दिनांक २१ मे रोजी सकाळी साडेदहा वाजता जिल्हा परिषद येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या हस्ते होणार असून, यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

दोन दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षण शिबिरात सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक नियोजन, पेन्शन व निवृत्तीवेतन विषयक माहिती, गुंतवणूक नियोजन, आरोग्य व जीवनशैली, सुरक्षितता, आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी उपाययोजना, कायदेशीर जागरूकता, आरोग्य विमा, कर्ज व आर्थिक सहाय्य तसेच निवृत्तीनंतर उपलब्ध विविध संधी याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या शिबिरामध्ये वित्त विभागाचे विशाल हिवरे, एसबीआयचे सतीश राऊत, निखिल लिमकर, विजय गंगवानी, डॉ. मनीषा जाधव, राहुल अमिलकंठवार, हरीश यादव, सेवानिवृत्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी गुडदे, सागर कोलेश्वर, कपिल ढवळे तसेच विकास अधिकारी ज्ञानेश्वर थेटे आदी मान्यवर विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.

जिल्हा परिषदेच्या वतीने सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी अशा प्रकारचे व्यापक मार्गदर्शन व नियोजनपर प्रशिक्षण प्रथमच आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्यात १२५ कर्मचाऱ्यांचा सहभाग असून, ही बॅच उद्या संपन्न होणार आहे. विविध विभागांतील सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतरचे जीवन अधिक सुरक्षित, सक्षम व नियोजनबद्ध करण्याच्या उद्देशाने या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांनी दिली.

उर्वरित १२५ सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी दिनांक २५ व २६ मे रोजी जिल्हा परिषद येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात दुसऱ्या टप्प्यातील मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात येणार आहे.

# विलास गजभारे यांना छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार जाहीर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सामाजिक कार्यकर्ते विलास गजभारे यांना अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने देण्यात येणारा 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार २०२६' घोषित करण्यात आला आहे.



या पुरस्काराचे वितरण २६ जून रोजी सिडको येथे एका कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. सामाजिक कार्यकर्ते विलास गजभारे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**पान १ वरून...**

**नांदेड येथे उपसंचालक...**

चारही जिल्ह्यांतील प्रवासासाठी सोयीस्कर ठरणार आहे. परिणामी नागरिकांची कामे वेळेत होतील. पैशाची आणि श्रमाची बचत होईल हेही निदर्शनास आणून दिले. त्यामुळे नांदेड येथे स्वतंत्र उपसंचालक कार्यालय मंजूर झाल्याने नांदेड, हिंगोली, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांना अधिक जलद, सुलभ आणि प्रभावी प्रशासकीय सेवा उपलब्ध होणार आहेत. खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर नांदेडला हे महत्त्वपूर्ण प्रशासकीय कार्यालय मंजूर केले, म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे खा. डॉ. अजित गोपछडे यांनी विशेष आभार मानले आहेत.

# बौद्ध भिक्षूंशिवाय धम्मप्रसार शक्य नाही -डॉ. गगन मलिक



**नांदेड (प्रतिनिधी)** –भारतात बौद्ध धम्म प्रचार आणि प्रसारात बौद्ध भिक्षूंचे कार्य अतुलनीय आहे. ते नेहमी मार्गदर्शकाच्या भूमिकेत असतात. बौद्ध उपासक आणि उपासिका यांनीही आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. बौद्ध विहारात बौद्ध भिक्षूंना असणारे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तेव्हा सर्वांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, बौद्ध भिक्षूंशिवाय धम्मप्रसार शक्य नाही, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अभिनेते तथा धम्म प्रसारक डॉ. गगन मलिक यांनी केले. ते तालुक्यातील खुरगाव, नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात बुद्ध पौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. त्यांनी यावेळी 'जयभीम'ची व्याख्याही सांगितली.

यावेळी श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक, भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धर्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो, सचिव भंते शीलरत्न यांच्यासह श्रामणेर भिक्खू संघ, उद्घाटक पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, प्रमुख अतिथी डॉ. मायकेल ले (जर्मनी), डॉ. क्रेन थेंग (जर्मनी), रिपब्लिकन हक्क परिषदेचे रमेश सोनाळे, बापुराव गजभारे, आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम, माधव जमदाडे, सुखदेव चिखलीकर, डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबिरे, राष्ट्रीय प्रबोधनकार राहुल अनविकर, कॉ. गणेश शिंगे उपस्थित होते.

यावेळी तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पुष्प पूजन करून अभिवादन करण्यात आले. अनेकांनी श्रामणेर दीक्षाभूमी बांधकामासाठी दान पारमिता केली. डॉ. गगन मलिक यांनी थायलंड बनावटीच्या ५० बुद्ध मूर्ती येथील दानशूर उपासक-उपासकांना भेट दिल्या.

**आंबेडकरी समाजाचा समन्वय आवश्यक –अबिनाश कुमार**

तथागत गौतम बुद्ध यांनी करुणा, समता, बंधुता, अहिंसा, प्रज्ञा यांची शिकवण दिली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हाच विचार पुढे नेत सामाजिक परिवर्तनासाठी बळ दिले. पोलीस प्रशासनाला समाजात शांतता, कायदा आणि सुव्यवस्था आवश्यक असते. परंतु पोलिसांची ही भूमिका पुरेशी नसते. समाजानेही पुढे येणे आवश्यक असते. अशा प्रकारच्या विधायक कार्यक्रमांत समाजात एकता, सौहार्द, बंधूभाव अधिक दृढ होतो. यासाठी आपण एकमेकांत समन्वय साधला पाहिजे. यामुळे देशपातळीवर प्रश्न सुटू शकतात, असेही पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार म्हणाले.



**मुखेड** –येथील नगरपालिकेच्या आरोग्य व स्वच्छता विभागाच्या सभापती सौ. अंजलीताई करण रोडगे व न.पा. पाणीपुरवठा सभापती विनोद दंडलवाड, भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष करण रोडगे यांनी वार्ड क्रमांक १० मधील जनतेच्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्याकरिता चार टँकरची सुविधा उपलब्ध करून दिली. (छाया : गणेश आंबेकर)

# १७ गोवंशांना जीवदान; ३६ लाख १६ हजारांचा मुद्देमाल जप्त, देगलूर पोलिसांची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)** –बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर देगलूर पोलिसांनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोवंशाची कत्तल होणार नाही याची काळजी घेतली आहे. पोलीस अधीक्षकांच्या आदेशावरून पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड व त्यांच्या टीमने अवैध कत्तलीसाठी जाणाऱ्या १७ गोवंश वाहतूक करणाऱ्या वाहनांचा पाठलाग करून पकडले आणि त्यांना जीवदान दिले. पोलिसांनी यावेळी सात जणांना अटक करून गोवंशासह ३६ लाख १६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. १७ गोवंशाना सुरक्षितता व पालनपोषणाच्या अनुषंगाने मुखेड गोशाळेच्या स्वाधीन केले आहे.

१८ मे २०२६ रोजी देगलूर पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड यांनी गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक महाजन म्हैसनवाड व अंमलदार पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंद्याची माहिती घेऊन कारवाई करण्याकरिता रवाना झाले होते. त्यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरुन ९.३० ते १०.४५ वाजताचे दरम्यान खालील ७ जण त्यांच्या ताब्यातील एक अशोक लिलैंड कंपनीचे छोटा टेम्पो रजिस्ट्रेशन (MH-26-BE-3052 किंमत ५ लाख रुपये) यामध्ये गोवंश जातीचा एक गोऱ्हा, २ गाय व १ कालवड असे एकूण ९२ हजार रुपयांचे तसेच एक आयचर १०५९ कंपनीचा टेम्पो रजिस्ट्रेशन क्रं. (MH-43-D-8997 किमत ८ लाख रुपये) या मध्ये गोवंश जातीचे ६ बेल किमत ४ लाख ७५ हजार रुपयाचे तसेच एक बोलेरो पिकअप चारचाकी वाहन क्रं. (MH-26-BE-9150 किंमत ७ लाख रुपये) या मध्ये गोवंश जातीचे ३ बैल किंमत २ लाख २० हजार रुपये तसेच एक बोलेरो पिकअप चारचाकी वाहन क्रमांक (MH-26-D-9626 किमत ७ लाख रुपये यामध्ये गोवंश जातीचे ३ बैल व १ कालवड किमत १ लाख २९ हजार रुपये यांची अवैधरित्या कत्तल करण्यासाठी जनावरांना नमूद वाहनात कोंबून घेऊन जातांना मदनूर नाका देगलूर येथे रोडवर मिळून आले. या कारवाईत ७ आरोपींविरुध्द पोलीस हवालदार मोहम्मद इमरान आणि श्रीनिवास जिंदमवार यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्याचा तपास हवालदार ज्ञानोबा केंद्रे व बालाजी पुरी करीत आहेत.

# भोकरमध्ये महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

**भोकर (प्रतिनिधी)–** जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती भोकरमध्ये विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.



शहरातील श्री महादेव मंदिर येथून जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेची मिरवणूक वस्ताद लहुजी साळवे चौक, बस स्टँड रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. आंबेडकर चौक, गांधी चौक मार्गे काढण्यात आली. या मिरवणुकीची सांगता महादेव मंदिर येथे करण्यात आली. जयंती उत्सवात बेलदरा, सावरगाव माळ, सोनारी, दापशेड, जुन्नी, जारीकोट येथील भजनी मंडळांचा सहभाग होता.

रात्री ९ वाजता शिवाचार्य महाराजांच्या प्रवचनाच्या प्रारंभी महाराज व मान्यवरांच्या हस्ते जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. बालयोगी व्यंकटस्वामी महाराज, दिगंबर शिवाचार्य गुरुमाऊली महाराज, महादेव शिवाचार्य महाराज, वेदाचार्य बस्वराज महाराज चिंचोलीकर यांनी महात्मा बसवेश्वर यांनी समतेची शिकवण देऊन बाराव्या शतकात अठरा पगड बहुजन समाजाला एकत्र करून समाजातील रूढी, परंपरा, अंधश्रद्धाविरुद्ध आवाज उठवून समता निर्माण केली. त्यांचे विचार आचरणात आणण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी अमरनाथ महाराज, अशोक महाराज, नगरसेविका वनश्री लक्षटवार, डॉ. व्यंकटराव माने, प्रकाश कोंडलवार यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष भगवानराव दंडवे म्हणाले, महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचा प्रचार, प्रसार करणे समाजाच्या विकासात्मक दृष्टीकोनातून गरजेचे असून, सर्व समाजातील लोकांचे सहकार्य, माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांची प्रेरणा, मार्गदर्शन व बालयोगी व्यंकटस्वामी महाराज यांच्या आशीर्वादामुळेच आपण नगराध्यक्ष झाल्याचे त्यांनी सांगितले. भोकर शहरात महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा उभारण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

प्रास्ताविक जयंती मंडळाचे अध्यक्ष सतिश देशमुख यांनी केले. तर सूत्रसंचालन डॉ. मनोज गिमेकर यांनी केले. शेवळी उपस्थितांचे आभार बालाजी येलपे यांनी मानले. जयंती उत्सवासाठी उज्वल केसराळे, ॲड. विशाल दंडवे, शिवराज स्वामी, मन्मथ शेट्टे, माधव श्रीखंडे, शंकराव देवठाणकर, त्र्यंबक पटवेकर, शंकर मिसाळे, सुरेश ठोणे, काशिनाथ देशमुख, एम. के. बिरादार, बालाजी ठोणे आदींनी परिश्रम घेतले.

फॅशन|संसार|सौंदर्य

# सखी

**जर तुम्ही जेल नेल मॅनिक्युअरचे शौकीन असाल, तर TPO नावाच्या रसायनावर अनेक देशांमध्ये बंदी घालण्यात आली आहे. हे हानिकारक रसायन जेल नेल पॉलिशमध्ये आढळते. ते सुकवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या UV लाईट रेडिएशनमुळे देखील नखांना गंभीर नुकसान होऊ शकते. अनेकदा अशा महिला क्लिनिक गाठत आहेत, ज्यांची नखे वारंवार जेल नेल ट्रीटमेंट घेतल्यानंतर अत्यंत पातळ, कोरडी आणि निर्जीव झाली आहेत. त्यामुळे त्वचारोगतज्ज्ञांनी अशा ट्रेंडपासून सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे. जेल नेल मॅनिक्युअरला एक सामान्य नित्यक्रम म्हणून करण्याऐवजी, त्यामागील सायन्स आणि त्यात असलेले धोके समजून घेणे उत्तम आहे.**




# जेल नेल्स ट्रेंड का बनतोय धोकादायक?

## सुरक्षिततेच्या टिप्सबद्दल जाणून घ्या...

**जेल नेल मॅनिक्युअर प्रक्रियेमुळे तुमच्या नखांच्या नैसर्गिक थरावर परिणाम होतो. जेल नेल पॉलिश लावण्याच्या प्रक्रियेत असे अनेक टप्पे आहेत ज्यामुळे नखे आणि त्वचेच्या समस्या वाढू शकतात.**

- बफिंग आणि फाइलिंग : या प्रक्रियेत जेल नेल योग्यरित्या चिकटण्यासाठी नखांचा वरचा थर काढला जातो. फाइलिंगमुळे केवळ नखे ठिसूळ होत नाहीत, तर त्यांची नैसर्गिक चमकही नाहीशी होते.
- यूव्ही क्युरिंग : जेल पॉलिश लावल्यानंतर नखे सुकवण्यासाठी १.५ ते २ मिनिटांसाठी यूव्ही किंवा एलईडी दिव्याखाली ठेवली जातात. यामुळे तुमची त्वचा हानिकारक किरणांच्या संपर्कात येते.
- काढण्यास अवघड : जेल नेल्स काढणे देखील अवघड असते. नखे १०-१५ मिनिटांसाठी ॲसिटोनमध्ये भिजवली जातात. त्यानंतर ती खरवडून काढली जातात. यामुळे नखे कोरडी आणि कमकुवत होतात. या प्रक्रियेमुळे कधीकधी नखे तुटण्याची शक्यताही असते.



### यूव्ही लॅम्पमुळे नखे, त्वचेला होणारे नुकसान...

जेल नेल पॉलिश सुकवण्यासाठी वापरले जाणारे एलईडी लॅम्प यूव्हीए (UVA) किरणे उत्सर्जित करतात, जे हानिकारक सूर्यप्रकाशापेक्षाही अधिक तीव्र असतात. ते त्वचेच्या खोलवर शिरतात. यूव्ही लॅम्पच्या किरणांच्या वारंवार संपर्कात आल्याने हातांवर सुरकुत्या, बारीक रेषा आणि काळे डाग येऊ शकतात. कधीतरी वापरल्यास धोका कमी असतो, परंतु योग्य सुरक्षा खबरदारीशिवाय यूव्ही लॅम्पचा वारंवार वापर केल्यास त्वचेच्या कर्करोगाचा धोका वाढू शकतो. संशोधनातून असे दिसून आले आहे की जेल नेल्समध्ये असलेले TPO सारखे रसायन महिलांच्या प्रजनन क्षमतेवरही परिणाम करतात. यामुळेच अनेक देशांमध्ये जेल नेल पॉलिशवर बंदी घातली जात आहे.

### जेल नेल्स आणि DIY किट्सचे दुष्परिणाम

स्टायलिश जेल नेल्सची महागडी प्रक्रिया स्वस्त करण्यासाठी बाजारात कमी किमतीचे DIY किट्स विकले जात आहेत. पण हा किफायतशीर ट्रेंड तुमच्या आरोग्यासाठीही हानिकारक ठरू शकतो. सलूनमधील तज्ञ व्यावसायिक नियमांचे पालन करत असले तरी, अनुभवाशिवाय स्वतःहून जेल नेलची रसायने वापरल्यास संसर्ग आणि नखांचे नुकसान होण्याचा धोका असतो. DIY जेलमधील रसायन ॲक्रिलेट्समुळे हातांवर खाज सुटणे, लालसरपणा किंवा लहान फोड येऊ शकतात. जेल नेट मॅनिक्युअरमुळे कधीकधी क्यूटिकल्सना (नखांच्या मुळाशी असलेली त्वचा) इजा होऊ शकते, ज्यामुळे बुरशीजन्य संसर्गाचा धोका वाढतो. स्वतःच्या वापरासाठीच्या DIY किट्सवरील सूचना न वाचता ते लावणे किंवा अतिनील (UV) प्रकाशाच्या संपर्कात जास्त वेळ राहणे धोकादायक ठरू शकते. माहिती नसताना खबरदारी घेणे, जेल नेल्स सोलून काढणे किंवा चुकीच्या पद्धतीने काढल्यामुळे नखांचे कायमचे नुकसान होऊ शकते.

### या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका

- नखे खूप पातळ दिसत असल्यास.
- जेल नेल्स काढल्यानंतर वारंवार नखे तुटत असल्यास.
- नखांवर काळे डाग किंवा पिवळेपणा आल्यास.
- क्युटिकल्सच्या (नखांच्या मुळाशी असलेल्या त्वचेच्या मुळाशी) खाज सुटणे, लालसरपणा, सूज किंवा पू आल्यास.
- नखे त्यांच्या मुळापासून वेगळी झाल्यास.
- हातांवरील वांगांचे प्रमाण वाढणे आणि त्वचेचा रंग गडद होणे.
- या सर्व परिस्थितींमध्ये, संसर्ग आणि गंभीर आरोग्य समस्या टाळण्यासाठी त्वरित त्वचारोग तज्ञाचा सल्ला घ्या.

### घ्यावयाची खबरदारी

- जेल नेल ब्युटी ट्रेंडमुळे तुमची नखे आकर्षक दिसू शकतात, परंतु या प्रक्रियेसाठी तुमच्या नखांच्या आरोग्याची किंमत मोजू नका. त्यामुळे, जेल नेल मॅनिक्युअर करताना खबरदारी आणि सुरक्षिततेचे नियम पाळणे महत्त्वाचे आहे. ते कसे ते जाणून घ्या :
- जेल नेल मॅनिक्युअर करण्याच्या २० मिनिटे आधी तुमच्या हातांना ब्रॉड-स्पेक्ट्रम सनस्क्रीन लावा.
- जेल नेल्स सतत लावू नका. दुसऱ्या जेल नेल मॅनिक्युअरपूर्वी २० दिवसांचा ब्रेक घ्या.
- प्रत्येक मॅनिक्युअरनंतर तुमच्या नखांना योग्य रिकव्हरीसाठी २० दिवस वैयक्तिक काळजी द्या.
- जेल नेल ट्रीटमेंटसाठी प्रमाणित सलून निवडा. घरी ते काढण्याची चूक करू नका.

### हे सुरक्षित पर्याय वाढवतील तुमच्या नखांचे सौंदर्य...

**जेल नेल्स तुमच्या नखांचे सौंदर्य वाढवू शकतात, परंतु ही प्रक्रिया बरीच जोखमीची आहे. जर तुम्हाला तुमची नखे कोणत्याही धोक्याशिवाय सुंदर आणि आकर्षक ठेवायची असतील, तर तुम्ही काही सुरक्षित पर्याय वापरून पाहू शकता.**

- रेग्युलर नेल पेंट : रेग्युलर नेल पेंटमध्ये रसायनांचा संपर्क कमीत कमी असतो आणि त्यासाठी यूव्ही (UV) प्रकाशाची गरज नसते. ते सहजपणे काढता येतात.
- स्वतः लावायची प्रेस-ऑन नेल्सः पुन्हा वापरता येणारी नखे सहज उपलब्ध असतात. ही स्टायलिश असतात, तसेच चिकट पदार्थाच्या (adhesive) मदतीने लावायला आणि काढायला सोपी असतात.
- डिप पावडर मॅनिक्युअर : डिप पावडर मॅनिक्युअर हा देखील एक सुरक्षित पर्याय आहे, कारण त्यात यूव्ही (UV) प्रकाशाचा वापर होत नाही. तथापि, हे फक्त व्यावसायिकाकडूनच करून घेतले पाहिजे.

जरी जेल नेल्स फक्त विशेष प्रसंगी केले तर हानिकारक नसतात, तरीही जेल नेल मॅनिक्युअर करण्यापूर्वी तुम्ही सुरक्षिततेचे नियम, योग्य तंत्र आणि एका प्रतिष्ठित व्यावसायिकाची निवड करावी, जेणेकरून तुमच्या नखांच्या सौंदर्यासाठी तुमच्या आरोग्याला किंमत मोजावी लागणार नाही.

# सॉफ्ट अन् ग्लो त्वचेसाठी आयुर्वेदिक स्क्रब बनवा घरीच

चमकदार त्वचा मिळवण्यासाठी एक्सफोलिएशन (त्वचेच्या बाहेरील थरावरून मृत पेशी आणि घाण काढून टाकण्याची प्रक्रिया) हा एक चांगला मार्ग आहे. कोरडी, तेलकट आणि संवेदनशील त्वचेसाठी वात, पित्त आणि कफ यावर आधारित तीन प्रकारचे घरगुती एक्सफोलिएटिंग स्क्रब वापरले जाऊ शकतात. यासाठी बेसन, मुलतानी माती, कोरफड, मध आणि गुलाब जल लागते, या सर्व गोष्टी भारतीय घरांमध्ये सहज उपलब्ध असतात. जर तुमच्या घरी या गोष्टी नसतील, तर त्या बाजारातून सहज विकत घेता येतात. आयुर्वेदात, एक्सफोलिएशन म्हणजे केवळ मृत त्वचा काढून टाकणे नव्हे; तर तो 'उद्वर्तन'चा एक सौम्य प्रकार आहे. उद्वर्तन एक प्राचीन आयुर्वेदिक थेरपी आहे. ज्यात संपूर्ण शरीराला औषधी वनस्पतींच्या चूर्णाने (उबटन) किंवा तेलाने घासून मालिश केली जाते. हे वजन कमी करण्यासाठी, त्वचा सुधारण्यासाठी आणि कफ दोष संतुलित करण्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. यामुळे 'आम' (विषारी पदार्थ) बाहेर टाकण्यास, रक्ताभिसरण सुधारण्यास आणि शरीरातील दोषांचे संतुलन साधण्यास मदत होते.

### त्वचेला बनवतात मऊ अन् चमकदार

- नैसर्गिक एक्सफोलिएटर्स त्वचेच्या वरच्या थरातील मृत पेशी, घाण आणि साचलेली विषारी द्रव्ये स्वच्छ करतात, ज्यामुळे त्वचेला अधिक चांगल्या प्रकारे श्वास घेता येतो.
- ही प्रक्रिया त्वचेच्या नैसर्गिक उष्णतेलाही आधार देते, ज्यामुळे रक्तप्रवाह सुधारतो आणि त्वचेची चमक वाढते.
- एक्सफोलिएशननंतर पौष्टिक तेल आणि मॉइश्चरायझर्स देखील अधिक प्रभावीपणे शोषले जातात, ज्यामुळे त्वचेचा पोत सुधारतो आणि मऊपणा वाढतो.
- नियमित आणि सौम्य एक्सफोलिएशनमुळे बंद झालेली छिद्रे, निस्तेजपणा आणि त्वचेतील असंतुलन देखील दूर होते.
- जेव्हा स्क्रब व्यक्तीच्या शरीर प्रकारानुसार तयार केले जातात, तेव्हा या पद्धतीमुळे आणखी चांगले परिणाम मिळतात.

### कोरड्या त्वचेसाठी आयुर्वेदिक स्क्रब

- या प्रकारची त्वचा वात प्रकृतीची असते, ज्यामुळे ती नैसर्गिकरित्या कोरडी, खडबडीत आणि निर्जीव असते. त्वचेचे संतुलन पुनर्संचयित करण्यासाठी तेल-आधारित आणि पौष्टिक स्क्रब फायदेशीर ठरतात.
- साहित्य : बेसन, मध, बदामाचे तेल, गुलाबजल. कृती : २ मोठे चमचे बदामाचे तेल ३ मोठ्या चण्याच्या पिठात मिसळा. मिश्रणात १ मोठा चमचा मध घाला. पेस्टला पातळसरपणा येण्यासाठी गुलाबजल घाला.
- फायदे : बेसन त्वचेतील नैसर्गिक तेल काढून न टाकता अशुद्धी स्वच्छ करते. बदामाचे तेल, त्वचेला मुलायम करणाऱ्या गुणधर्मांनी समृद्ध असल्यामुळे, त्वचा मऊ करते. तेल त्वचेची लवचिकता वाढवते आणि पोत सुधारते. मध, एक नैसर्गिक आर्द्रता टिकवणारा पदार्थ असल्यामुळे, त्वचेला आर्द्र ठेवण्यास मदत करतो. गुलाबजल त्वचेला थंडावा देण्यास मदत करते. हे मिश्रण त्वचेला हळूवारपणे स्वच्छ करते आणि मृत पेशी काढून टाकते, ज्यामुळे त्वचा निरोगी आणि चमकदार दिसते.

**बाजारात उपलब्ध असलेल्या बहुतेक स्क्रबमध्ये अशी रसायने असतात जी त्वचेला हानी पोहोचवू शकतात. त्याऐवजी आयुर्वेदिक स्क्रब वापरा. बेसन, मुलतानी माती, मध आणि इतर साहित्य वापरून ते घरी कसे तयार करावे आणि लावावे याबद्दल जाणून घेऊया...**



### तेलकट त्वचेसाठी आयुर्वेदिक स्क्रब

- तेलकट त्वचा पित्त-प्रधान आणि अत्यंत संवेदनशील असते. तसेच, या त्वचेला दाह होण्याचा धोका जास्त असतो. म्हणून, त्वचेला थंडावा देणाऱ्या सौम्य आणि हलक्या एक्सफोलिएटरची आवश्यकता असते.
- साहित्य : गुलाबजल, मुलतानी माती, कोरफड जेल, मध. कृती : ३ मोठे चमचे मुलतानी मातीत २ मोठे चमचे कोरफड जेल मिसळा. १ मोठा चमचा मध घाला. मिश्रणात २ मोठे चमचे गुलाबजल घाला. एकजीव पेस्ट तयार होईपर्यंत सर्वकाही एकत्र मिसळा. (टीपः मुलतानी मातीऐवजी चंदन पावडरचाही वापर करता येतो.)
- फायदे : याच्या वापरामुळे त्वचेतील अतिरिक्त पित्त शांत होते, ज्यामुळे दाह कमी होतो. मुलतानी माती त्वचेच्या खोलवर जाऊन अतिरिक्त तेल शोषून घेते. कोरफड त्वचेला आराम देते. मध त्वचेतील आर्द्रता टिकवून ठेवतो. गुलाबजल त्वचेला ताजे आणि टवटवीत दिसण्यास मदत करते. जेव्हा याचा वापर शरीरातील घटक संतुलित करतो, तेव्हा त्वचेला बरे होण्यास मदत होते. हे त्वचेची छिद्रे बंद न करता त्वचेची चमक वाढवते.

### संवेदनशील त्वचेसाठी आयुर्वेदिक स्क्रब

- या प्रकारच्या त्वचेवर कफ आणि वात या दोन्हींचा प्रभाव असतो. त्यामुळे, त्वचेला त्रास न देता खोलवर स्वच्छता करण्यासाठी सौम्य एक्सफोलिएटर हा सर्वोत्तम पर्याय आहे.
- साहित्य : ओट्स, मध, दूध, कोरफड जेल. कृती : एका भांड्यात २ मोठे चमचे बारीक दळलेले ओट्स घ्या. ओट्समध्ये १ मोठा चमचा मध घाला. १-२ मोठे चमचे दूध घाला. (त्याऐवजी तितकेच पाणी वापरू शकता). थोडे कोरफड जेल घाला. मिश्रण चांगले फेटून घ्या. (टीपः ओट्सऐवजी तांदळाचे पीठ देखील वापरता येते.)
- फायदे : ओट्स त्वचेची जळजळ शांत करण्यास मदत करतात. त्वचा लवकर बरी होण्यास मदत करतात. मध त्वचेला आर्द्रता देतो. दुधातील नैसर्गिक एन्झाइम्स त्वचेला हळूवारपणे एक्सफोलिएट करतात आणि मृत त्वचा काढून टाकतात. कोरफड त्वचेला शांत आणि आराम देते. त्वचा मऊ आणि गुळगुळीत होते.

### वापरण्याची पद्धत

त्वचा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा. यामुळे त्वचेची छिद्रे उघडतील आणि खोलवर स्वच्छता होण्यास मदत होईल. तयार केलेल्या स्क्रबचा थोडासा भाग घ्या आणि ३ ते ५ मिनिटे वरच्या दिशेने गोलाकार गतीने हलक्या हाताने मसाज करा. कोपर, गुडघे आणि घोटे यांसारख्या खडबडीत भागांवर विशेष लक्ष द्या आणि दाब किंचित वाढवा. कोपर कोमट पाण्याने धुवा आणि नंतर मऊ टॉवेलने हलकेच पुसून घ्या. त्वचा किंचित ओलसर असताना बॉडी ऑइल किंवा मॉइश्चरायझर लावा. यामुळे त्वचेला अधिक आर्द्रता मिळेल.



### ही खबरदारी घ्या...

हे एक्सफोलिएटर्स नैसर्गिक घटकांपासून बनवलेले असले तरी, त्यांचा वापर आठवड्यातून फक्त एकदा किंवा दोनदाच करा. अतिवापरामुळे त्वचेला जळजळ आणि भाजल्यासारखे होऊ शकते. वापरण्यापूर्वी नेहमी पॅच टेस्ट करा. मिश्रणाचा थोडासा भाग हाताच्या आतील बाजूस लावा. २४ तास थांबा आणि काही प्रतिक्रिया येते का ते पहा. त्वचेचे नुकसान टाळण्यासाठी स्क्रबचा पोत नेहमी गुळगुळीत किंवा खूप बारीक ठेवा. जखमेवर, सक्रिय पुरळांवर, एक्झिमाच्या किंवा मुरुमांच्या वाढलेल्या भागावर स्क्रब वापरणे टाळा, कारण यामुळे स्थिती आणखी बिघडू शकते. स्क्रब लावल्यानंतर त्वचेला कोणतीही जळजळ जाणवल्यास, तो ताबडतोब धुवून टाका. अस्वस्थता कायम राहिल्यास किंवा वाढल्यास, वैद्यकीय सल्ला घ्या.

# एआय, डिजिटल नवोपक्रम आणि सायबर सुरक्षेत देशात महाराष्ट्र आघाडीवर

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रात कृषीपासून नागरिक सेवा वितरणापर्यंत प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानामुळे मोठे परिवर्तन होत असून राज्य शासन एआय, ई-गव्हर्नन्स आणि डिजिटल नवोपक्रमाच्या माध्यमातून प्रशासन अधिक सक्षम आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी काम करत आहे, असे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक तथा प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांनी सांगितले.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक तथा प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, महाराष्ट्राच्या राजकीय नेतृत्वाला तंत्रज्ञानाची सखोल जाण असून सार्वजनिक हित, रोजगारनिर्मिती आणि उद्योगांच्या वाढीसाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जात आहे. राज्य शासनाने ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स (जीसीसी) साठी स्पष्ट धोरण आखले असून बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या अनेक व्यवसाय प्रक्रिया आता भारतात स्थलांतरित होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील माहिती तंत्रज्ञान विभागाला स्वतंत्र विभागाचा दर्जा देण्यात आला असून 'महा आयटी'साठी स्वतंत्र व्यवस्था उभारण्यात आली आहे. नागरिकांना वारंवार तीच कागदपत्रे सादर करावी लागू नयेत यासाठी राज्याने 'गोल्डन डेटाबेस' विकसित केला आहे. या प्रणालीमुळे नागरिकांची माहिती एकत्रित स्वरूपात उपलब्ध राहणार असून विविध योजनांसाठी पात्रता एपीआयच्या माध्यमातून आपोआप पडताळली जाणार आहे. त्यामुळे कागदोपत्री प्रक्रियेला मोठा वेग मिळणार आहे. राज्यातील विविध विभागांत ई-ऑफिस प्रणाली लागू करून प्रशासकीय कामकाजाचे डिजिटायझेशन करण्यात येत आहे. शासनाने १०० दिवसांचे आणि १५० दिवसांचे विशेष उपक्रम राबवून विभागीय कामकाजाला गती दिली आहे. जिल्हास्तरावर उपग्रह चित्रांच्या साहाय्याने अतिक्रमण शोधणे, जंगलतोडीवर नियंत्रण ठेवणे तसेच दुष्काळ किंवा अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे मूल्यांकन करून शेतकऱ्यांना मदत देण्याची प्रक्रिया अधिक स्वयंचलित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र स्वतःचे एआय विद्यापीठ स्थापन करण्याच्या दिशेने काम करत असून तंत्रज्ञान क्षेत्रातील मनुष्यबळ निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे. राज्यातील सायबर सुरक्षेसाठी २०१५ मध्ये जवळपास एक हजार कोटी रुपयांच्या तरतुदीसह 'महाराष्ट्र सायबर' कार्यक्रम सुरू करण्यात आला. याअंतर्गत एफबीआय तसेच फ्रान्स आणि एस्टोनियाच्या धर्तीवर ४७ अत्याधुनिक सायबर प्रयोगशाळा उभारण्यात आले. आता 'महाराष्ट्र सायबर सिक्युरिटी कॉर्पोरेशन'च्या माध्यमातून ही क्षमता अन्य शासकीय विभाग आणि उद्योग क्षेत्रालाही उपलब्ध करून दिली जाणार आहे.

प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांनी सांगितले की, राज्याने 'ॲग्री एआय पॉलिसी' लागू केली असून तंत्रज्ञान वापरातील भाषा आणि साक्षरतेच्या अडथळ्यांवर मात करण्याचा प्रयत्न सुरू आहे. कोरकू, भिल, माडिया यांसारख्या स्थानिक बोलीभाषांमध्ये शेतकऱ्यांना साध्या मोबाईलवर आवाजाच्या माध्यमातून पिके, खत व्यवस्थापन आणि बाजारपेठेबाबत माहिती मिळू शकेल, अशी एआय आधारित व्यवस्था विकसित करण्यात येत आहे.

डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन (डीपीडीपी) कायद्याच्या अंमलबजावणीसाठीही राज्य शासन तयारी करत असल्याचे त्यांनी सांगितले. डेटा लोकलायझेशनच्या गरजा लक्षात घेऊन स्वदेशी डेटा सेंटर उभारणीवर भर दिला जात असून पुढील वर्षी मे महिन्यापर्यंत या कायद्याची पूर्ण अंमलबजावणी अपेक्षित असल्याचेही ब्रिजेश सिंह यांनी सांगितले.

# २३ मेपूर्वी चर्चेला या – मनोज जरांगे



**जालना (प्रतिनिधी)** – मी कधीच स्वतःहून कोणाला चर्चेसाठी निमंत्रण देत नाही. परंतु, भाजप आमदार प्रसाद लाड यांच्या बोलण्यात एक आपुलकी आणि माया दिसून आली, तसेच मुख्यमंत्र्यांकडून १०० टक्के मागण्या मान्य करून घेऊ असा शब्द त्यांनी दिला. म्हणूनच समाजाने त्यांना चर्चेचे निमंत्रण दिले आहे. आता त्यांनी याकडे दुर्लक्ष करू नये आणि सरकार किंवा पक्षासाठी मराठा समाजाशी दगाफटका करू नये, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. प्रसाद लाड यांनी दिलेल्या शब्दावर विश्वास ठेवून आम्ही गावोगावच्या बैठका थांबवल्या आहेत, त्यामुळे त्यांनी २३ मेपूर्वी चर्चेला यावे, असे आवाहनही जरांगे पाटील यांनी केले.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, माझ्या आवडी-निवडीचा कोणताही मंत्री सरकारमध्ये नाही. अनेक मंत्री रोज बोलत असतात, पण आम्ही कोणालाही चर्चेसाठी बोलावत नाही. प्रसाद लाड यांचे शब्द खरे वाटल्यानेच त्यांना आमंत्रित केले आहे. सरकार एखाद्या आमदाराच्या माध्यमातून काय डाव टाकेल हे सांगता येत नाही, त्यामुळे आपण पूर्ण विश्वास ठेवू शकत नाही. मला कोणाबद्दलही आकस किंवा द्वेषभावना नाही, पण माझ्या समाजाला आरक्षण मिळाले नाही, तर मी कोणाला सोडणार नाही.

आरक्षणाच्या मागण्यांवर बोलताना जरांगे पाटील म्हणाले, मला राजकारण करायचे नाही, तर माझ्या समाजाच्या लेकरांचे भले करायचे आहे. हैदराबाद गॅझेट चे श्रेय देवेंद्र फडणवीस यांचे आहे, ते त्यांनी खुशाल घ्यावे. आताच्या मागण्यांचे श्रेयही सरकारनेच घ्यावे, आमची काहीच हरकत नाही. मुख्यमंत्र्यांनी आमच्या सर्व मागण्या मान्य कराव्यात, म्हणजे आम्हाला आंदोलन करण्याची गरजच उरणार नाही. मनोज जरांगे म्हणाले की, प्रसाद लाड चर्चेला येणार म्हणून आम्ही काही दिवस थांबलो आहोत. जर ते आले नाहीत, तर ऐनवेळी आंदोलनाची तयारी करायला कमी दिवस मिळतील. त्यामुळे ३० मे रोजी होणारे आंदोलन आम्ही अजिबात थांबवणार नाही. हे आंदोलन कोणत्याही द्वेषातून नसून मुलांच्या हक्कासाठी आहे.

आपल्या भूमिकेविषयी समाजात कोणताही संभ्रम राहू नये यासाठी स्पष्टीकरण देताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, मी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी किंवा काँग्रेस अशा कोणत्याही राजकीय पक्षाच्या विरोधात आहे, असा गैरसमज कोणी करून घेऊ नये. मी केवळ एक आंदोलक आहे आणि माझ्या समाजाच्या मुलांच्या भविष्यासाठी लढत आहे. जर मुख्यमंत्री आमच्या सर्व मागण्या १०० टक्के मान्य करणार असतील, तर आम्हाला उगाच आंदोलन करण्याची कोणतीही हौस नाही. आम्ही सरकारविरोधात लढत आहोत, कारण मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी सरकारविरोधातच लढावे लागते.

# रस्त्यावरील व दुर्लक्षित बालकांच्या पुनर्वसनासाठी फिरते पथक स्थापन करणार; आदिती तटकरे



**मुंबई (प्रतिनिधी)** – रस्त्यावर राहणाऱ्या, अनाथ, एकल आणि दुर्लक्षित बालकांच्या पुनर्वसनासाठी 'फिरते पथक' पथदर्शी योजना सहा जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यात आली होती. या पथदर्शी योजनेच्या धर्तीवर २२ जिल्ह्यातील ३१ महानगरपालिकांमध्ये फिरते पथक योजनेसाठी प्रस्ताव मागविण्याचे निर्देश महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.मंत्रालयात 'फिरते पथक' योजनेसंदर्भात आयोजित बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीस संबंधित अधिकारी उपस्थित होते.या योजनेअंतर्गत मोबाईल वाहनांच्या माध्यमातून रस्त्यावरील बालकांना पौष्टिक आहार, आरोग्य सेवा, शिक्षण, मनोरंजन सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच बालकांची आधार नोंदणी, समुपदेशन, मानसिक आधार आणि पालकांमध्ये शिक्षणाबाबत जनजागृती करण्यात येते. रस्त्यावरील बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

यापूर्वी नाशिक, पुणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे आणि नागपूर या सहा जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात आला होता. या प्रकल्पाद्वारे आतापर्यंत ३ हजार ८०३ बालकांना शैक्षणिक, आरोग्यविषयक, मनोरंजन तसेच आहार सुविधा पुरविण्यात आल्या असून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात यश आले आहे. त्यामध्ये पुणे जिल्ह्यात सर्वाधिक १ हजार ६७९, मुंबई शहरात ८१०, ठाण्यात ७५०, नाशिकमध्ये २८५ आणि नागपुरात २७९ बालकांचा समावेश आहे.राज्यातील २८ महानगरपालिका क्षेत्रांसह मुंबई शहर, पूर्व उपनगर आणि पश्चिम उपनगर अशा एकूण ३१ फिरत्या पथकांची अंमलबजावणी प्रस्तावित करण्यात आली आहे.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, स्वयंसेवी संस्थांना मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमांतर्गत नोंदणी, निधी पोर्टलवरील नोंद, मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल तसेच संस्थेची घटना आणि नियमावली सादर करणे आवश्यक राहील. तसेच फिरत्या पथकांसाठी नियुक्त वाहनांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि ट्रॅकिंग सिस्टीम बसविणे बंधनकारक करण्यात येणार असून ही यंत्रणा संबंधित पोलीस विभागाच्या समन्वयाने कार्य करेल.

## राष्ट्रवादीच्या बैठकीस रोहित पवार अनुपस्थित

**मुंबई (प्रतिनिधी)** – राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची आज महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला मात्र आमदार रोहित पवार यांनी पाठ फिरवल्याचे पाहायला मिळाले. शरद पवारांनी अजित पवार गटातील सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांची काही दिवसांपूर्वी स्तुती केली होती, त्यामुळे रोहित पवार नाराज असल्याचे बोलले जात आहे. त्यात त्यांनी या बैठकीला दांडी मारल्याने नाराजीच्या चर्चेला उधाण आले आहे. तर पक्षाचे नेते शशिकांत शिंदे यांनी बैठकीबाबत पत्रकार परिषद घेत माहिती दिली आहे.

शशिकांत शिंदे म्हणाले, फार मोठ्या उमेदीने पक्ष पुढे नेण्यासाठी सर्वांचा सहभाग असावा, त्यात खासदार असतील, आमदार असतील, ज्यांनी निवडणुका लढवल्या आहेत त्या सगळ्यांना बरोबर घेऊन आणि सगळ्यांनी वेळ देऊन पक्षात पूर्णपणे महाराष्ट्रात शरद पवारांच्या नेतृत्वाखाली सक्षम विरोधी पक्ष म्हणून आम्ही उभा करण्याच्या संदर्भात बैठकीत चर्चा झाली.

# एसआयआरच्या मुद्द्यावरून महाविकास आघाडीने घेतली निवडणूक आयोगाची भेट




**मुंबई (प्रतिनिधी)** – मतदार यादीतून नावे वगळण्याच्या प्रक्रियेबाबत (एसआयआर) देशभरात निर्माण झालेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर, महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आज निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर माहिती देताना शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांच्यासोबतची चर्चा सकारात्मक झाल्याचे सांगत, महाराष्ट्रातील आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये कोणत्याही पात्र मतदाराचे नाव वगळले जाऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच, पश्चिम बंगाल आणि बिहारमधील निवडणुकांमध्ये या प्रक्रियेचा भाजपला फायदा झाल्याचा संदर्भ देत, महाराष्ट्रात अशी पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी नागरिक म्हणून सर्वांनीच सतर्क राहण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले, आपल्या सर्वांना हे माहीत आहे की आज महाविकास आघाडीने निवडणूक आयोगाची भेट घेतली. देशभरात जा जो एक प्रश्न गाजला आहे की एसआयआर, मतदारांना मतदार यादीतून वगळण्याचे काम सुरू आहे. त्यावर आमच्या अनेक शंका आणि सूचना होत्या ते सर्व घेऊन आम्ही आज निवडणूक आयोगासोबत आणि निवडणूक आयोगाचे सीइओ चोकलिंगम साहेबांसोबत सखोल चर्चा केली. सकारात्मक चर्चा झाली आणि अनेक विषयांवर चर्चा झाली आहे. या चर्चेतून जे काही आम्ही सूचना केल्या आहेत त्याची अंमलबजावणी होईल असे आत्ता तरी आम्हाला वाटत आहे. तरी देखील आम्ही यावर काम करत आहोत. ज्या नागरिकांना भीती वाटत असेल किंवा शंका असतील त्यांना यांच्या पक्षाकडून मदत करायचे काम करत आहोत.

पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, महाराष्ट्रात निवडणुका लोकसभेची असो किंवा विधानसभेची असो, ही 'एसआयआर'ची जी संपूर्ण प्रक्रिया आहे ती सुरळीत व्हावी, नीट व्हावी, कोणालाही वगळण्यात येऊ नये. जी रीतसर यादी आहे, नागरिक आहेत, मतदार आहेत त्यांचे नाव वगळण्यात येऊ नये, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. याबाबत आम्ही चर्चा केली आहे. आपण पाहिले असेल की बिहारमध्ये जे काही झाले किंवा बंगालमध्ये जे काही झाले, असे म्हटले जाते की पश्चिम बंगालची निवडणूक ही एसआयआरच्याच प्रक्रियेमुळे भाजपने जिंकलेली आहे. त्यात जवळपास ९० टक्के योगदान आहे एसआयआरचे. हे जरी खरे असले तरी महाराष्ट्रात आणि इतर राज्यात जिथे एसआयआर सुरू होईल आता ते होऊ नये यासाठी आपल्या सर्वांची नागरिक म्हणून जबाबदारी आहे.

## भूमी अभिलेख विभागाची ५० नवी कार्यालये सुरु होणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – प्रशासकीय कामकाज लोकाभिमुख आणि वेगवान करण्यासाठी, भूमी अभिलेख विभागाच्या सुधारित आकृतीबंधानुसार नव्याने ५० कार्यालये निर्माण करण्यात आली असून, १० हजार ६८३ पदांच्या आकृतीबंधाला मूर्तरूप देण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय आणि आदेश बुधवारी प्रसिद्ध करण्यात आला.महसूल विभागाच्या अधिपत्याखालील भूमी अभिलेख विभागातील कामकाजाचा वाढता व्याप लक्षात घेऊन शासनाने ११ मार्च २०२६ रोजी १० हजार ६८३ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मंजुरी दिली होती. या अंतर्गत राज्यभरात अनेक नवीन कार्यालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली होती. आता या नव्या कार्यालयांना मूर्त रूप देत त्यांचे प्रशासकीय कार्यक्षेत्र आणि मुख्यालयाचे ठिकाण निश्चित करण्यात आले आहे.

# इराणने सहमती दर्शवली नाही, तर नाटो होर्मुझमध्ये प्रवेश करणार

**वॉशिंटन (वृत्तसंस्था)** – इराण आणि अमेरिकेतील युद्धामुळे जागतिक तेल पुरवठा कोलमडला असताना आता मोठी बातमी समोर येत आहे. आंतरराष्ट्रीय सागरी मार्गावरील इराणची नाकेबंदी मोडून काढण्यासाठी 'नाटो' होर्मुझच्या सामुद्रधुनीत लष्करी हस्तक्षेप करण्याची शक्यता आहे. ब्लूमबर्गच्या अहवालानुसार, जुलै महिन्यापर्यंत जर इराणने हा मार्ग खुला केला नाही, तर नाटोचे युद्धनौका दल या भागात तैनात केले जाऊ शकते.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जगाच्या एकूण गरजेपैकी सुमारे २०% तेल आणि वायूची वाहतूक होते. इराणने हा मार्ग रोखल्यामुळे आणि अमेरिकेने केलेल्या नौदल नाकेबंदीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत युद्धपूर्व पातळीपेक्षा ५०% पेक्षा जास्त वाढ झाली आहे. सध्या कच्चे तेल प्रति बॅरल ११० डॉलरच्या पार गेल्याने जगभरात महागाईचा हाहाकार उडाला आहे.

यापूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या लष्करी सहभागाच्या आवाहनाला युरोपीय देशांनी नाकारले होते. मात्र, आता वाढत्या आर्थिक नुकसानीमुळे नाटोच्या भूमिकेत अचानक मोठा बदल झाला असून, अंकारा येथील आगामी बैठकीत यावर अंतिम शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. एप्रिलमध्ये ट्रम्प यांचा प्रस्ताव नाकारणाऱ्या नाटो सदस्य राष्ट्रांनी आता इराणविरोधात एकत्र येण्याची तयारी सुरू केली आहे. इराणला जुलैच्या सुरुवातीपर्यंतची मुदत दिली जाण्याची शक्यता आहे. अन्यथा व्यापारी जहाजांच्या संरक्षणासाठी नाटो थेट बळाचा वापर करू शकते. तेलाच्या टंचाईमुळे जागतिक विकासाचा वेग मंदावला असून, जगभरातील शेअर बाजार आणि अन्नधान्य पुरवठ्यावर याचा थेट नकारात्मक परिणाम होत आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जलवाहतुकीत व्यत्यय आल्यामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढतच आहेत. सध्या, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल ११० डॉलरपेक्षा जास्त झाली आहे. वाढत्या महागाईच्या धोक्यामुळे जगभरात घबराट पसरली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धामुळे निर्माण झालेल्या या जागतिक तणावाचा नकारात्मक परिणाम यावरून लक्षात येतो की, कच्च्या तेलाची किंमत युद्धपूर्व पातळीपेक्षा जवळपास ५०% नी वाढली आहे, यामुळे फक्त महागाईचा धोकाच नाही, तर जागतिक विकासाचा वेग मंदावण्याची चिंताही वाढली आहे.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


## Change In Name

My old name is **SAIKH YAKUBALI AHMADALI** Which now I am Changing as new Name **SHAIKH YAKHUB AHEMADALI** Hence forth my all correspondence Will be done as per my new name. Please consider, the same. **Address-At. Post MALKAUTHA Tq. Mudkhed, Dist. Nanded Maharashtra-431806 Mo. No. 9765348105**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, भाग्यश्री माधव कल्याणकर, शुभांगी रमेश ढवळे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५५४), जुना वार्ड नं. (०३) मधील प्लॉट नं. (६६) मालमत्ता नं. (११४०) नवीन वार्ड क्र. (०२) नवीन मालमत्ता नं. (११८२) साईज पूर्व-पश्चिम १२.११ मीटर, दक्षिण-उत्तर ९.१४ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. ५५,
पश्चिमेस : रस्ता,
दक्षिणेस : प्लॉट नं. ६७, उत्तरेस : रस्ता.

श्री सुधीर मधुकरराव मामीडवार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, नईम अहेमद अब्दुल रऊफ यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (....), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (०५) मालमत्ता नं. (ए-४६२) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (२६१०) साईज पूर्व-पश्चिम ९.५५ मीटर, दक्षिण-उत्तर १३.८० मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. ०६,
पश्चिमेस : मोकळी जागा,
दक्षिणेस : १५ फुटाचा रस्ता, उत्तरेस : नाला.

श्री खा. जवाजोद्दीन खा. अली यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार सौ. मनिषा भ्र. गोविंदराव बुलबुले, रा.वजिराबाद, नांदेड यांनी दिलेल्या माहिती हक्क व अधीकारावरुन तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी दि. १०/०५/२०१२ रोजी पुरुषोत्तम पिता सांभ अमिलकंठवार रा.श्रीपाद नगर, कौठा, ता.जि.नांदेड यांच्याकडुन मौजे. कौठा ता. जि. नांदेड येथील गट क्र.८४ मधील एक प्लॉट ज्याचा प्लॉट नं.४६ असुन ज्याची लांबी पूर्व-पश्चिम ४० फुट व रुंदी दक्षीण-उत्तर : ३० फुट एकुण क्षेत्रफळ १२०० चौ. फुट आहे. ज्याची चतुःसिमा पुर्वेस – ६.०० मी. रुंद रस्ता आहे. पश्चिमेस – प्लॉट नं. ३१ आहे. दक्षिणेस – प्लॉट नं.४७ आहे व उत्तरेस – प्लॉट नं.४५ असुन अशा वर्णनाचा प्लॉट खरेदी केला असुन त्याचा नोदणीकृत खरेदिखत क्र.३९८४/२०१२ हा असुन माझ्य पक्षकाराचा सदरील मालमत्तेवर खरेदिखताच्या तारखे पासुन ताबा आहे.

अशी वस्तुस्तिथी असताना सुध्दा वरील मालमत्तेशी काही असंबंधीत लोक काही बनावट कागदपत्रे तयार करुन माझ्या पक्षकाराचा उपरोक्त प्लॉट इतर कोणास परत विक्री करण्याचा प्रयत्न करीत आहेत. माझे पक्षकार हे वर नमुद प्लॉट चे कायदेशीर मालक व कब्जेदार आहेत तसेच माझे पक्षकाराकडे उपरोक्त प्लॉटचे कायदेशीर खरेदीखत आहे.

तरी या जाहिर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस सुचित करण्यात येते की उपरोक्त नमुद माझ्या पक्षकाराच्या प्लॉट संबंधी कोणीही खरेदीविक्रीचा, हस्तांतरनाचा वगैरे व्यवहार करु नये. तसे केल्यास संबंधीत व्यक्ती कायदेशीर कार्यवाहीस जबाबदार राहतील. सबब हे जाहिर प्रगटन.

| मार्फत : | प्रगटन देणार |
| --- | --- |
| ॲड.डि.टी. शेळके, | सौ. मनिषा भ्र. गोविंदराव बुलबुले, |
| रा. नांदेड | रा. वजिराबाद, नांदेड |
| मो. ९८२३३५४१८० | मो.नं. ९८९०८९३८४७ |

**॥ जाहीर प्रगटन ॥**

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी, भोकर यांचे न्यायालयात**

**जन्म - जन्म नोंदणी सुधारणा कायदा - 2023 मध्ये कलम 11(3)अन्वये अर्ज क्रं.**

**अर्जदार श्री. श्रावण पंजाबराव हाके रा. थेरबन ता. भोकर जि. नांदेड**

**विरुध्द**

**जन्म - मृत्यू नोंदणी निबंधक तथा मुख्याधिकारी नगर परिषद ता.भोकर**

**विषय:- जन्म - मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा 2023 च्या कलम 11 (2) व (3) अन्वये अर्जदार श्री श्रावण पंजाबराव हाके रा. थेरबन ता भोकर यांची मुलगा राम श्रावण हाके याच्या जन्माची नोंद घेण्याकरीता आदेशीत करणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार श्री श्रावण पंजाबराव हाके रा. थेरबन ता. भोकर यांनी त्यांची मुलगा राम श्रावण हाके याचा जन्म 24/09/2024 रोजी संजीवनी हॉस्पिटल भोकर ता. भोकर येथे झाला असून सदर जन्माची नोंद जन्म- मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा 2023 च्या कलम 11 (2) व (3) अन्वये घेण्याकरीता जन्म - मृत्यू नोंदणी निबंधक तथा मुख्याधिकारी नगर परिषद ता.भोकर यांचे मार्फत प्रस्ताव सादर केला आहे.

ज्याअर्थी राम श्रावण हाके याच्या जन्माची नोंद नगर परिषद भोकर येथे उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की राम श्रावण हाके याच्या जन्माची नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून 15 दिवसामध्ये या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

तहसीलदार तथा
तालुका दंडाधिकारी, भोकर

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, नईम अहेमद अब्दुल रऊफ यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५१४), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (०६) मालमत्ता नं. (ए-४६३) नवीन वार्ड क्र. (....) नवीन मालमत्ता नं. (२६१२) साईज पूर्व-पश्चिम ...... मीटर, दक्षिण-उत्तर ..... मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. ०७,
पश्चिमेस : प्लॉट नं. ०५,
दक्षिणेस : १५ फुटाचा रस्ता, उत्तरेस : नाला.

श्री खा. जवाजोद्दीन खा. अली यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, नईम अहेमद अब्दुल रऊफ यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५१४), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (०९) मालमत्ता नं. (.....) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (२६१५) साईज पूर्व-पश्चिम ...... मीटर, दक्षिण-उत्तर ..... मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : २० फुटाचा रस्ता,
पश्चिमेस : प्लॉट नं. ०८,
दक्षिणेस : १५ फुटाचा रस्ता, उत्तरेस : नाला.

श्री खा. जवाजोद्दीन खा. अली यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, विठ्ठलराव गंगाधर भोंबे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५२५), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (....) मालमत्ता नं. (डी-१/१) नवीन वार्ड क्र. (१०) नवीन मालमत्ता नं. (२५११/१) साईज पूर्व-पश्चिम ...... मीटर, दक्षिण-उत्तर ..... मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : भोकर तामसा रोड
पश्चिमेस : ४.५ मीटरचा रस्ता,
दक्षिणेस : प्लॉट क्र. ५०, उत्तरेस : मोकळी जागा

श्री सुधीर मामीडवार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, बालाजी रामराव उतनुरवार यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५२५), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (....) मालमत्ता नं. (डी-१/१/१) नवीन वार्ड क्र. (१०) नवीन मालमत्ता नं. (२५११/१/१) साईज पूर्व-पश्चिम १८.४५ मीटर, दक्षिण-उत्तर ४.५७ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : भोकर तामसा रोड
पश्चिमेस : ४.५ मीटरचा रस्ता,
दक्षिणेस : मोकळी जागा, उत्तरेस : प्लॉट नं. ५२

श्री सुधीर मधुकरराव मामीडवार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ७७६७७७१७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## सुरक्षेसाठी दिलेले १८ तोळे सोने हडपले; ईस्लापूरच्या सराफा व्यापाऱ्यावर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –घर असुरक्षित असल्याने विश्वासाने जतन करण्यासाठी दिलेले लाखो रुपयांचे तब्बल १८ तोळे ४ ग्रॅम सोन्याचे दागिने परस्पर फसवणूक करून हडप करणाऱ्या ईस्लापूर येथील 'सकवान ज्वेलर्स'चा मालक सतीश बाबूराव सकवान याच्याविरुद्ध ईस्लापूर पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिला डॉ. शिल्पा शंकरराव वाळकीकर यांनी दिलेल्या लेखी तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून, या कारवाईमुळे संपूर्ण किनवट तालुक्यासह सराफा बाजारात मोठी खळबळ उडाली आहे.

वाळकी (बु.) येथील रहिवासी असलेल्या डॉ. शिल्पा वाळकीकर या एकल महिला आहेत. सन २०१३ मध्ये त्यांचे घर गावात एका बाजूला व असुरक्षित असल्याने चोरीच्या भीतीने त्यांनी व त्यांचे दिवंगत वडील कै. शंकरराव वाळकीकर यांनी मिळून स्वतःचे ३० तोळे सोन्याचे दागिने ओळखीचे सराफ सतीश सकवान याच्याकडे सुरक्षेसाठी (लॉकरमध्ये ठेवण्यासाठी) सुपूर्द केले होते. मात्र, याच विश्वासाचा गैरफायदा घेत सराफाने ते दागिने परस्पर बँकेत गहाण ठेवून व विकून स्वतःसाठी ईस्लापूर परिसरात चार मोठे महागडे प्लॉट्स खरेदी केले व त्यावर दुकाने आणि आलिशान घर बांधले, असे पीडित महिलेचे म्हणणे आहे.

वडिलांच्या आजारपणात दवाखान्यासाठी पैशांची नड असतानाही या सराफाने टाळाटाळ केली. पीडित महिला नोकरीनिमित्त दिल्ली येथे स्थलांतरित झाल्यानंतरही त्यांचा पाठपुरावा सुरूच होता. अखेर ३० डिसेंबर २०२२ रोजी आरोपीच्या वडिलांनी मध्यस्थी करत ११ तोळे ६.९७० ग्रॅम दागिने परत केले व उर्वरित १८ तोळे ४ ग्रॅम दागिने सतीश परत करेल असे आश्वासन दिले. मात्र, ३ वर्षे उलटूनही उर्वरित सोने किंवा त्याची चालू बाजारभावानुसार किंमत परत न देता आरोपी सतीश सकवान याने ४ जानेवारी २०२६ रोजी डॉ. शिल्पा यांना चक्क जीवे मारण्याची धमकी दिली.

हा गुन्ह्याचा प्रकार १ जानेवारी २०१३ पासून ते १७ मे २०२६ या प्रदीर्घ कालावधीत घडला आहे. डॉ. शिल्पा यांनी १८ मे रोजी पोलीस ठाण्यात हजर राहून लेखी तक्रार दिली होती. या प्रकरणात नव्या कायद्यानुसार गुन्हा नोंद केला. पीडित महिला डॉक्टरने सादर केलेले भक्कम पुरावे, ऑडिओ क्लिप्स आणि साक्षीदार तपासून ईस्लापूर पोलिसांनी नवीन फौजदारी कायद्यानुसार आरोपी सतीश बाबूराव सकवान कलम ३१६(२), गुन्हेगारी विश्वासघात, कलम ३१८(२) योजनाबद्ध फसवणूक, कलम ३५२ शांतता भंग करण्याच्या उद्देशाने हेतुपुस्सर अपमान करणे, कलम ३५१(२) जीवे मारण्याची धमकी देणे या कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस ठाण्यापासून ५ किलोमीटर अंतरावर असलेल्या सहस्रकुंड वाळकी बु. या घटनास्थळाला भेट देऊन ईस्लापूर पोलीस करीत आहेत.

> मी एक एकल महिला असून दिल्लीवरून सतत पाठपुरावा करणे अत्यंत खर्चीक व त्रासाचे होते. मागील वर्षभरापासून वारंवार तक्रार करूनही कारवाई होत नव्हती. मात्र आता गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी माझे १८ तोळे सोने चालू बाजारभावाप्रमाणे व्याजासह परत मिळवून द्यावे आणि अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या सराफाला कठोर शिक्षा करावी, अशी मागणी डॉ. शिल्पा वाळकीकर यांनी केली आहे.

## साडेतीन लाख रुपयांचे ब्राऊन शुगर जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)** –स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाडसी कारवाई करत एका युवकाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून तीन लाख ६० हजार रुपयांचे ब्राऊन शुगर जप्त केले आहे. ही कारवाई २० मे रोजी दुपारी जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागील रस्त्यावर सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे यांच्या पथकाने केली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांना वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे कारवाई करण्याबाबत आदेशीत केले होते. दि. २० मे २०२६ रोजी सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना गोपनीय बातमीदारांकडून माहिती मिळाली की, अमृतसर पंजाब येथून एक महिला अंमली पदार्थ विक्रीसाठी नांदेड येथे आली आहे. सदर महिला नांदेड कोर्ट ते हिंगोली गेट जाणाऱ्या बायपास रोडवर अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार आहे, ही माहिती वरिष्ठांना कळवून कायदेशीर प्रक्रिया केली. घटनास्थळी राजविंदरकौर जर्मनजितसिंग महाल (वय ३८ वर्ष, रा. दुरीया जिल्हा अमृतसर राज्य पंजाब), गुरमुखसिंग ऊर्फ गुरी सेवकसिंग गिल (वय २८ वर्षे, रा. गुरूव्दारा गेट नं ६ शहीदपुरा नांदेड) हे दोघे मिळून आले. त्यांची अंगझडती घेतली असता दोघांच्या ताब्यात ७२.०३ ग्रॅम वजनाचे अंमली पदार्थ ब्राऊन शुगर (चिट्टा), १२० रुपये व एक स्कुटी असा एकूण ४ लाख ७० हजार २७० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. याबाबत आरोपींची चौकशी केल्यानंतर गुन्ह्यात इतर आरोपी अमनप्रितसिंग ऊर्फ मनी जगजीतसिंग बेदी (वय ३० वर्ष, रा. गुरूब्दारा गेट नं.०२ नांदेड), जनार्धन ऊर्फ पटेल गोविंदराव सोनटक्के (वय ३१ वर्ष, रा.ब्राम्हणवाडा ता.जि. नांदेड) यांचा सहभाग असल्याचे आढळून आल्याने त्यांना सुध्दा ताब्यात घेण्यात आले आहे.

या घटनेतील मुद्देमाल जप्त करून नमूद इसमांना ताब्यात घेवून मुद्देमालासह पो.स्टे. वजिराबाद, नांदेड यांचे ताब्यात देण्यात आले.

## ऑपरेशन क्रॅकडाऊन अंतर्गत ५६ गुन्ह्यांत ७१ जणांवर कारवाई; सव्वा कोटींचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)**– पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दि. १ ते ३१ मे दरम्यान नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेदरम्यान एकोणिसाव्या दिवशी अवैध व्यवसायाविरुद्ध कारवाई करून एक कोटी रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर मोहिमेच्या १९ व्या दिवशी लातूर जिल्ह्यातील गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीत १ लाख २ हजार ९२० रुपये किंमतीचा गुटखा जप्त करण्यात आला असून, यातील आरोपींविरुद्ध कलम १२३ भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काल दिवसभरात नांदेड परिक्षेत्रात मटका जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण (१८) इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत ८ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ४३ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे अवैध दारू विक्री करणाऱ्या ३३ इसमांविरुद्ध ३३ गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून ७४ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध वाळू उपसा करणाऱ्या ६ इसमांविरुध्द ३ गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून १ कोटी १६ लाख ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपरोक्त कारवाई सोबतच शस्त्र अधिनियमान्वये ३, कोटपा अन्वये ७ तर इतर अधिनियमाखाली मिळून, एकूण ५६ कारवाया करण्यात आल्या आहेत. यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून एकूण १ कोटी २३ लाख ७३ हजार ४९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## मांडवीतील कृषी केंद्रांवर कृषी विभागाची झाडाझडती



**किनवट (प्रतिनिधी)** –युरिया खताची कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांना चढ्या दराने खत विक्री होत असल्याच्या तक्रारींची दखल घेत कृषी विभागाने मोठी कारवाई केली आहे. बुधवार, दि. २० रोजी किनवट तालुका कृषी अधिकारी व गुण नियंत्रक यांच्या पथकाने मांडवी येथील कृषी केंद्रांची झाडाझडती घेतली. या धडक मोहिमेमुळे मांडवीतील खत विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून, कारवाईच्या भीतीने एका दुकानदाराने चक्क शटर टाकून पळ काढल्याचे सांगण्यात आले.

किनवट पंचायत समितीचे तालुका कृषी अधिकारी शिवराम मुंडे आणि गुण नियंत्रक गजानन भालेवाड यांच्या पथकाने मांडवी येथील दुकानांची बुधवारी सकाळी तपासणी केली असता गंभीर बाबी समोर आल्या. जगदंबा कृषी सेवा केंद्र व श्री कृपा कृषी सेवा केंद्र या दोन्ही दुकानांमधील युरिया खताच्या प्रत्यक्ष साठ्यात आणि कागदोपत्री नोंदीत मोठी तफावत आढळून आली. शेंडे कृषी केंद्र या दुकानात चौकशी केली असता, ज्या व्यक्तीच्या नावावर शेतीच नाही, अशा बोगस व्यक्तीच्या नावाने पावती फाडण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. झाडाझडतीची कुणकुण लागताच एका दुकानदाराने कारवाईच्या धास्तीने दुकान बंद करून पळ काढल्याचे सांगण्यात आले.

तपासणी सुरू असतानाच 'श्री कृपा कृषी सेवा केंद्रात' एक शेतकरी युरिया खत मागण्यासाठी आला. गोदामात व स्टॉक रजिस्टरवर ७० पोती साठा उपलब्ध असूनही दुकानदाराने अधिकाऱ्यांसमोरच, माझ्याकडे युरियाचे एकही पोते नाही, असे उत्तर शेतकऱ्याला दिले. दुकानदाराचा हा बेजबाबदारपणा पाहून तपासणी अधिकाऱ्यांचा संताप अनावर झाला. साठा असतानाही शेतकऱ्यांना खत नाकारणे आणि त्यांची लूट करणे खपवून घेतले जाणार नाही, असे कृषी अधिकाऱ्यांनी दुकानदाराला सुनावले. ज्या कृषी केंद्रांच्या साठ्यात तफावत आढळली आहे आणि ज्यांनी नियमांचे उल्लंघन केले आहे, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठीचा विस्तृत प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठवला जाणार आहे, अशी माहिती तालुका कृषी अधिकारी शिवराम मुंडे व गजानन भालेवाड यांनी दिली

कृषी विभागाच्या या धडक कारवाईमुळे साठेबाजांचे धाबे दणाणले असून, आता या दोषी कृषी केंद्र चालकांचे परवाने रद्द होणार की त्यांच्यावर गुन्हे दाखल होणार? याकडे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## बिलोलीच्या उपजिल्हा रुग्णालयात अस्थिरोग तज्ज्ञ व साधनसामुग्रीचा अभाव

**बिलोली (प्रतिनिधी)** –येथील ग्रामीण रुग्णालयात अस्थिरोग तज्ज्ञ व फॅक्चरच्या उपचारासाठी साधनसामुग्री नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे. तसेच या रुग्णालयात उपकरणांचा अभाव असल्यामुळे रुग्णांवर योग्य असे उपचार होत नाहीत. तेव्हा वरिष्ठांनी या प्रकरणी लक्ष घालून अस्थितरोग तज्ज्ञांची नेमणूक करावी व तुटवडा असलेल्या साहित्याची व्यवस्था करावी, अशी मागणी या भागातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

महाराष्ट्र व तेलंगणा या दोन राज्यांसह नायगाव, धर्माबाद, उमरी व देगलूर या चार तालुक्यांशी जोडून असलेल्या बिलोली येथे काही वर्षांपूर्वी ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित होते. बिलोली येथील कुंडलवाडी मार्गावर असलेल्या ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणी वर्धन करून बिलोली येथे उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित करण्यात आले. तेलंगणा व महाराष्ट्र या दोन राज्यांसह चार तालुक्यांशी थेट रस्तेमार्ग असलेल्या आणि नेहमीच अपघाताचे रुग्ण येणाऱ्या बिलोली येथील उपजिल्हा रुग्णालयात अस्थिरोग तज्ज्ञ नसल्याने एखाद्या लहान-मोठ्या उपघातात जखमी झालेल्या व हाडाला दुखापत झालेल्या रुग्णांना प्लास्टर करण्यासाठी नांदेड किंवा अन्य खाजगी रूग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात येत असल्याची गंभीर बाब उघडकीस आली आहे.

या प्रकरणी वरिष्ठांनी लक्ष घालून बिलोली तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात अस्थिरोग तज्ज्ञांची नियुक्ती करावी, अशी मागणी या भागातील नागरिकांनी केली आहे.

## अवैध वाळू वाहतुकी विरोधात महसूल विभागाची कारवाई; रेतीसह ट्रॅक्टर जप्त



**किनवट (प्रतिनिधी)**– तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीला आळा घालण्यासाठी महसूल विभागाने धडक कारवाई करत विनापरवाना रेती वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर रेतीसह जप्त केला. ही कारवाई बुधवार, दि. २० रोजी बोधडी खुर्द येथे करण्यात आली.

सहायक जिल्हाधिकारी जेनीतचंद्र दोन्तुला, तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाच्या पथकाने ही कारवाई केली. बोधडी खुर्द परिसरात अवैधरित्या रेती वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. कारवाईदरम्यान रेतीने भरलेला ट्रॅक्टर पकडून जप्त करण्यात आला. संबंधित ट्रॅक्टर किनवट तहसील कार्यालय येथे जमा करण्यात आला. या कारवाईत मंडळ अधिकारी जयराम गाडे, ग्राम महसूल अधिकारी निकिता फोले, हरीश यादव, अनुसया ईप्पलवाड आणि संदीप मडावी यांनी सहभाग घेतला. अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा महसूल विभागाने दिला आहे.

## अवैध रेती वाहतूक : तीन टिप्परांसह १ कोटी ६० हजारांचा मुद्देमाल जप्त



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या 'ऑपरेशन क्रॅकडाऊन' मोहिमेंतर्गत नायगाव पोलिसांनी अवैध रेती वाहतुकीवर मोठी कारवाई करत तीन टिप्परांसह लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध रेती माफियांमध्ये मोठी खळबळ उडाली असून, पोलिसांच्या धडक मोहिमेची जिल्हाभर चर्चा होत आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यातील सर्व प्रभारी अधिकाऱ्यांना अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार दि. १८ मे २०२६ रोजी प्रभारी पोलीस निरीक्षक शशांत एन. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली नायगाव पोलिसांनी ही धडक कारवाई केली.

सहायक पोलीस उपनिरीक्षक सोपान वळगे, पोलीस कर्मचारी नारायण नंदेवार व ज्ञानेश्वर पुणेबोईनवाड हे शासकीय वाहनातून पेट्रोलिंग करीत असताना मध्यरात्री अंदाजे १.५४ वाजताच्या सुमारास गडगा ते कहाळा मार्गावरील मांजरम बसस्थानक परिसरात पोहोचले. यावेळी कोलंबीकडून संशयास्पदरीत्या येणारे तीन टिप्पर पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी तत्काळ वाहनांना अडवून चौकशी केली असता संबंधित वाहनांमधून अवैधरीत्या रेतीची वाहतूक सुरू असल्याचे उघड झाले.

## युवासेनेकडून आरसीसी कोचिंग क्लासेसवर शाईफेक व तोडफोड



**नांदेड (प्रतिनिधी)**– नीट पेपर फुटीप्रकरणात दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करत ठाकरे सेनेच्या युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी बुधवारी शहरातील आरसीसी कोचिंग क्लासेसवर हल्लाबोल चढविला. यावेळी कोचिंग क्लासेसवर शाईफेक करुन शिवराज मोटेगावकर यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी लावून धरली.

नीट परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे देशभरातील २२ लाख विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. नीट परीक्षेचा पेपर दहा लाख रुपयात विकत घेण्यात आला. महाराष्ट्रात आरसीसी कोचिंग क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर, प्रा. कुलकर्णी, मनीषा मांढरे, मनीषा वाघमारे यांच्यासह अनेकांचा समावेश आहे. या लोकांच्या चुकीमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा खेळखंडोबा झाला असून, या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान व राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करत युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी शहरातील आरसीसी कोचिंग क्लासेसवर हल्लाबोल चढवत शाईफेक केली.

यावेळी गणेश पेन्सलवार, सौरभ देवकत्ते, अशोक पावडे, नवज्योतसिंघ गाडीवाले, रवी नागरगोजे, बालाजी धुमाळ, गजानन हरकरे, विकास गच्चे, विकास सूर्यवंशी, प्रसाद देवणे आदी शिवसैनिकांची उपस्थिती होती.

## केमिस्ट संघटनेच्या निवडणुकीवरून आरोप

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेच्या त्रैवार्षिक निवडणुकीत भोकर येथील राजेश्वर लोकावाड (रेड्डी) यांना निवडणूक प्रक्रियेतून बेदखल करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार राजेश्वर लोकावाड यांनी जिल्हाध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्याचबरोबर भोकर तालुका कार्यकारिणी सदस्य पदासाठीही त्यांनी नामनिर्देशन अर्ज भरला होता. मात्र एका पदाचा अर्ज मागे घेण्यासाठी त्यांनी अंतिम दिवशी निवडणूक अधिकाऱ्यांकडे रीतसर अर्ज जमा केला होता. संबंधित अर्ज स्वीकारल्याचे सीसीटीव्ही फुटेजही उपलब्ध असल्याचे सांगितले जात आहे. परंतु एका पदाचा अर्ज कार्यालयातूनच गहाळ झाल्याचे समोर आले. त्यामुळे एक उमेदवार एकाच पदासाठी निवडणूक लढवू शकतो, या नियमाचा आधार घेत राजेश्वर लोकावाड यांचा अध्यक्षपदाचा अर्ज फेटाळण्यात आला. हा अर्ज जाणीवपूर्वक फेटाळण्यात आल्याचा आरोप लोकावाड यांनी केला आहे.

## जिल्ह्यात दोन फसवणुकीच्या घटना उघड

### शिवाजीनगर आणि मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील शिवाजीनगर आणि मुदखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत फसवणुकीच्या दोन वेगळ्या घटना उघडकीस आल्या आहेत. एका प्रकरणात शाळेतील शिक्षक पदाच्या बनावट नियुक्तीद्वारे १ लाख ९० हजार २५८ रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे समोर आले आहे, तर दुसऱ्या प्रकरणात आयसीआयसीआय बँकेत नोकरी लावून देण्याच्या खोट्या आश्वासनावरून ५ लाख ५० हजार रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

दि. १० फेब्रुवारी २०१८ ते १९ मे २०२६ या कालावधीत मुदखेड येथील अब्दुल कलाम उर्दू हायस्कूलमध्ये आरोपींनी संगणकाचा वापर करून शालेय समितीची बनावट बैठक दाखवली व खोटी कागदपत्रे तयार केली. याद्वारे आरोपी आसमा बेगम खाजामिया यांना शिक्षक पदावर नियुक्त केल्याचे दिसून येते. मात्र, त्या व्यक्तीने कोणतीही सेवा न देता संस्था आणि शासनाकडून १ लाख ९० हजार २५८ रुपयांचा मोबदला घेतला. याप्रकरणी फिर्यादी शेख मैनोदीन शेख फरीद (वय ७०, रा. रेल्वे स्टेशन मुदखेड) यांनी तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS-२०२३) कलम ३१८ (४), ३१६ (२), ३१६ (५), ३३८, ३३६(३), ३४०(२), ६१(२), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक कांबळे करत आहेत. या प्रकरणात इतर आरोपींमध्ये मुजीब अहेमद अमोरोद्दीन अंसारी, नुसरत फातेमा सय्यद विकार हाशमी खान, वाजिद अहेमद अमोरोद्दीन अन्सारी, जावेद अहेमद अमोरोद्दीन अन्सारी यांचा समावेश आहे.

तर दुसऱ्या घटनेत दि. १ एप्रिल २०२६ ते १९ मे २०२६ या दरम्यान नवीन मोंढा, नांदेड येथे राहणाऱ्या फिर्यादी कृष्णा नागनाथ गोपीवार (वय ४१, रा. विष्णूनगर, नांदेड) यांना आरोपींनी आयसीआयसीआय बँकेत नोकरी लावून देण्याचे खोटे आश्वासन दिले. या बदल्यात त्यांच्याकडून ५ लाख ५० हजार रुपये घेऊन आर्थिक फसवणूक केली.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com